LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही., ५०% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.९२ व ९३ सारडा सेंट्रल, डि.पी. रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३५ वे अंक ३४३ वा फोन २३०१०१ दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 | RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# आघाडी नाही, योगेशभैय्या सर्व जागा कमळावर लढणार
# ऐनवेळी अनेक इच्छुक उमेदवारांच्या बीडमध्ये कोलांटउड्या

बीड दि.१६ (प्रतिनिधी):– राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर अत्यंत घाईगडबडीत म्हणजे काही तासातच डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आपल्या समर्थकांसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी नगर येथे जाऊन भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली योगेशभैय्यांनी भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढविण्याचे निश्चित केले आहे. यामुळे बीड शहरात भाजपाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे बोलले जाते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पुर्वसंध्येला अनेक इच्छुक उमेदवारांनी राजकीय गणित जुळत नसल्यामुळे इकडून तिकडे कोलांटउड्या घेतल्या.



## सर्वच पक्ष नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आज दुपारी जाहीर करणार

बीड नगर पालिका निवडणुकीसाठी कोणत्याच राजकीय पक्षाने अद्याप नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केलेले नाहीत. वेगवेगळ्या नावाची चर्चा चालू आहे. बीड नगर पालिकेचे अध्यक्षपद हे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित आहे. विविध पक्षांनी चाचपणी केलेली आहे. कोणत्या पक्षाकडून कोण उमेदवार येत आहे याचा अंदाज घेत आज दुपारपर्यंत सर्व राजकीय पक्षांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारी अर्ज भरले जाणार आहेत. नगर पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे.

## योगेशभैय्या सोबत असणारे मुस्लिम नगर सेवक घड्याळावरच लढणार

निवडणुकीच्या ऐन तोंडावर राष्ट्रवादीचा राजीनामा देऊन योगेश क्षीरसागर यांनी भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केलेला आहे. बीड शहरात त्यांच्या सोबत असणारे अनेक विद्यमान मुस्लिम नगर सेवक आहेत. त्यामुळे त्यांची अडचण झाली आहे. या सर्व मुस्लिम इच्छुक उमेदवारांनी राष्ट्रवादीच्याच घड्याळ चिन्हावर निवडणूक लढविणे पसंत केले आहे. त्यांनी योगेशभैय्यांसोबत पक्षांतर केलेले नाही.

## निवडणुकीसाठी अनेकांचे पक्षांतर

रविवारी बीड शहरामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय घडामोडी घडल्या. अनेक इच्छुक उमेदवारांनी ऐनवेळी पक्ष बदलले. तर काहींनी ऐन शेवटच्या क्षणी पक्ष प्रवेश केले. यात बीडचे माजी उपनगराध्यक्ष शिवाजी जाधव, किशोर काळे यांनी संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. तर राजेंद्र काळे, माजी सभापती बाळासाहेब जाधव हे शिंदेंच्या शिवसेनेकडून निवडणूक रिंगणात उतरले आहेत. बाळासाहेब गुंजाळ यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.

## आज ऐनवेळी अनेक उमेदवार बदलू शकतात

बीड शहरात मोठ्या प्रमाणात राजकीय घडामोडी घडत असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्या तसेच नगर सेवक पदासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी आपल्या विजयाचे गणित सोपे होण्यासाठी ऐनवेळी पक्ष बदल करण्याचा विचार ते करु शकतात. तशा हालचाली सुरु झालेल्या आहेत.

पक्षातंर्गत गटाबाजीला कंटाळून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शनिवारी त्यांच्याकडे असलेल्या पक्षाच्या विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याकडे पाठविला होता. नगर पालिका निवडणुकीमध्ये आपणाला विचारात न घेता निर्णय घेतले जातात, जाणीवपुर्वक निर्णय प्रक्रियेतून आपल्याला डावलले जात असल्याचा आरोप योगेश क्षीरसागर यांनी केला होता. योगेश क्षीरसागरांनी राजीनामा दिल्यानंतर पक्षश्रेष्ठींनी बीड नगर पालिकेच्या निवडणुकीची जबाबदारी आ.विजयसिंह पंडित यांच्याकडे दिली असून पंडित यांनी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन बीड शहरातील सर्व ५२ उमेदवारांचे नियोजन केले आहे. राष्ट्रवादीला सोडल्यानंतर काही तासातच म्हणजे रविवारी दुपारी योगेश क्षीरसागर यांनी आपल्या समर्थकांसह मंत्री पंकजाताई यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर

# पालकमंत्री अजितदादांच्या नावाखाली प्रशासकीय अधिकाऱ्यांची मनमानी

## बीड जिल्हा परिषदेत जाहीर निविदांचा केवळ देखावा

बीड दि.१६ (प्रतिनिधी):– पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नावाखाली प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांना दादांची भीती दाखवून आपली मनमानी चालवली आहे. जिल्हा परिषदेने डिजिटल सेंटर उभारण्यासाठी काढलेल्या निविदेत एकाच कंपनीला निविदा भरता येईल अशा प्रकारचे तांत्रिक हातचलाखी करून केवळ जाहीर ई–निविदेचा देखावा केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी तात्काळ चौकशी करून ही निविदा प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी इच्छुक निविदा धारकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे केली आहे. पारदर्शक कारभाराचा ढोल घडवणारे पालकमंत्री काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभाग अंतर्गत डिजिटल सेंटर उभारण्यासाठी ई-निविदा ३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये इंट्रॅक्टर पॅनल मिनी पीसी यूपीएस प्रोजेक्ट, इ लायब्ररी सॉफ्टवेअर अशा बाबींचा समावेश आहे. मात्र यात सर्व साहित्य एकत्रित करून काढलेल्या निवेदीमध्ये प्रोजेक्टरचे स्पेसिफिकेशन तांत्रिक तपशील हा विशिष्ट एकाच कँपनीशी जुळणार आहे त्यामुळे निविदा भरताना प्रोजेक्टरचा तांत्रिक तपशील जुळला तरच इतर सदरील निविदा भरता येते पान २ वर

### अधिकाऱ्यांची गुत्तेदारी तेजीत

पूर्वी अधिकारी टक्केवारी घेत असा जाहीरपणे आरोप केला जात होता. काही अधिकाऱ्यांची त्यामुळे तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या. मात्र आता अधिकारीच गुत्तेदारी करू लागले असल्याने आता दाद कुणाकडे मागायची? असा प्रश्न लोकांसमोर पडला असून अजित पवारांची भीती दाखवून मनमानी सुरू केली आहे.

# माजी मंत्री सुरेश नवलेंची आज अजितदादांसोबत बैठक

## प्रवेशाचा मुहूर्त ठरणार

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- काही नगर पालिका निवडणुकीच्या तोंडावर माजी मंत्री सुरेश नवले, अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करत असल्यामुळे नगर पालिका निवडणुकीत याचा परिणाम दिसून येईल. नवले सध्या दादांच्या संपर्कात असून आज त्यांची बैठक होणार आहे. या बैठकीनंतर प्रवेशाचा दिवस निश्चित केला जाईल असे कळते.



माजी मंत्री सुरेश नवले यांनी बीड विधानसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. बीड शहराचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे. नवले यांनी शिवसेनेपासून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर ते कॉंग्रेस पक्षात गेले होते. नंतर त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. आता ते अजितदादांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. क्षीरसागरांना विरोध करणारा नेता म्हणून नवलेंची ओळख आहे. त्यांचे वक्तृत्व हे प्रभावी असून बीड विधानसभा मतदार संघाचा त्यांचा चांगला अभ्यास असल्यामुळे याचा फायदा अजितदादांना होईल, पक्षाची ताकद वाढेल. ऐन नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री नवलेंचा प्रवेश महत्वाचा मानला जात आहे.

## शेअर मार्केटबद्दल तज्ज्ञांचा गंभीर इशारा

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- जगभरातील शेअर बाजारांसाठी एक धोक्याची घंटा वाजत आहे. अनेक तज्ञ सांगत आहेत की हा AI किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा फुगा कधीही फुटू शकतो आणि शेअर बाजार कोसळू शकतो. एआय मधील प्रचंड वाढीमुळे हा फुगा तयार झाला आहे. तज्ञांच्या मते, जेव्हा हा फुगा फुटेल, तेव्हा शेअर बाजार सुरक्षित राहणार नाही. पान २ वर

# आ.सुरेश धस यांच्या हस्ते ०६ कोटी ७४ लाख रुपये खर्चाच्या ४ भव्य रस्ते विकास कामांचा आज शुभारंभ

आष्टी दि.१६ (प्रतिनिधी):- आष्टी विधानसभा मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणारे, कार्यक्षम आणि विकासाभिमुख आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून जिल्हा नियोजन विकास समितीकडून तब्बल ०६ कोटी ७४ लाख रुपये एवढा भरीव निधी मंजूर झाला आहे. या निधीतून तालुक्यातील चार महत्वाच्या रस्ते विकास कामांना मंजुरी मिळाली असून, या सर्व कामांचा भव्य शुभारंभ आज दि.१७रोजी होत आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांना या रस्त्यांच्या उन्नतीची प्रतिक्षा होती. अपुऱ्या दळणवळण सुविधांमुळे शेतकरी, कामगार, विद्यार्थी व सर्वसामान्य प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी पान २ वर

### मंजूर झालेली रस्ते विकास कामामध्ये

१. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते नांदूर ७० लाख रुपये निधी
२. राष्ट्रीय महामार्ग ५६१ ते अंभोराहिवरा १ कोटी ५४ लाख रुपये निधी
३. प्रमुख जिल्हा मार्ग १ ते पारोडीबोरोडी ३ कोटी ५० लाख रुपये निधी
४. लोणी ते खुंटेफळ–वाटेफळ १ कोटी रुपये निधी, या चार ही रस्ते कामांचा भव्य शुभारंभ अंभोरा येथे सकाळी १०.०० वा., नांदूर येथे सकाळी ११.०० वा. आणि पारोडी फाटा येथे १२.०० वा. या चार ही रस्ता कामांचा शुभारंभ आमदार सुरेश धस यांचे हस्ते करण्यात येणार आहे.

## १ कोटी महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळणार?

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- महाराष्ट्राच्या लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसीची अंतिम मुदत जवळ येत आहे. अंदाजे २३.५ दशलक्ष लाभार्थ्यांपैकी १ कोटींहून अधिक महिलांची अजूनही ई-केवायसी प्रलंबित आहे. परिणामी, लाखो महिलांना या योजनेतून वगळण्याचा धोका आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेने लाभार्थ्यांना मासिक १५०० देयके जाहीर केली. या योजनेअंतर्गत एकूण अंदाजे २३.५ दशलक्ष लाभार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तथापि, महिला आणि बालविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, आतापर्यंत पान २ वर

भारतातील सुप्रसिद्ध sancheti HOSPITAL
संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडीक्स अ‍ॅण्ड रिहॅबीलीटेशन (पुणे)
ऑर्थोपेडीक व स्पाईन सुपर स्पेशालिटी क्लिनिक
तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करतील
बाह्य रुग्ण सेवा (OPD) आपल्या बीड शहरात
आपल्याला खालील लक्षणे आहेत का?
- पाठदुखी, कंबरदुखी, गुडघ्यामध्ये तीव्र वेदना.
- पाठीखालील भाग बधिरता व मुंग्या जाणवणे.
- सांधेदुखी, गुडघेदुखी, सांधे प्रत्यारोपण, संधिवात व सर्व हाडांचे आजार



दीप हॉस्पीटल
मंगळवार दि.१८ नोव्हेंबर २०२५ सकाळी ११ ते दु.४ पर्यंत
: अपॉइंटमेंट व अधिक माहितीसाठी :
: संपर्क :
8888849648 9518306798

सेल्समन पाहिजे
बीडमध्ये हिंदुस्थान युनिलिव्हर एजन्सीच्या कामाकरीता होतकरू फ्रेशर किंवा अनुभवी, मार्केटिंगचे ज्ञान असलेले मुले किंवा मुली सेल्समन म्हणून पाहिजे.
– संपर्क –
9325056701
16187

बीड दि.१६ (प्रतिनिधी):– नगर पालिका निवडणूक जवळ आल्याने सुरक्षिततेसाठी सावध राहून ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवावा अशी मागणी होत आहे.

# रेशन धान्य अवैध विक्री करणाऱ्यांवर जिल्हाधिकाऱ्यांनी माजलगाव गाठून टाकली धाड

## शेकडो तांदळाचे कट्टे असणाऱ्या गोडाऊनला केले सील



माजलगाव दि.१६ (प्रतिनिधी):- तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयापासून काही मीटरवर असलेल्या बायपासवर रेशनचे तांदूळ व गहू बिनधास्तपणे साठवून ठेवत रात्री इतरत्र ठिकाणी ते वाहनात भरून पाठवले जातात. याची माहिती जिल्हाधिकारी यांना मिळाल्यानंतर त्यांनी थेट माजलगाव गाठले व त्यांनी सदरील ठिकाणी जाऊन धाड टाकली असता त्यांना या ठिकाणी शेकडो कट्टे रेशनचे आढळून आल्याने त्यांनी ते गोडाऊन सील करण्याचे आदेश दिले.

माजलगाव येथील शासकीय गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात गहू, तांदूळ व इतर साहित्य रेशनवर वाटण्यासाठी येत असते. गोडाऊनवर आलेल्या गहू व तांदळाच्या कट्ट्यातून पाच किलो धान्य काढले जात असल्याचे अ‍ॅड. नारायण गोले यांनी पुराव्यासह दाखवून दिले होते. पान २ वर

### सदरील गोडाऊनमध्ये मोठा साठा

अवैध रेशन धान्य असलेल्या गोडाऊन वर जिल्हाधिकारी यांनी धाड टाकली होती. यावेळी या गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात रेशनचा गहू व तांदूळ असल्याचे पुरवठा विभागाच्या एका कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# वेगळा माणूस घडवणारी AI

कृत्रिम बुद्धिमत्तेचे माणसाला जितके आकर्षण वाटत आहे, तितकेच भयही वाटत आहे. माणूस जेव्हापासून भाषा शिकला, लेखन कला शिकला तेव्हापासूनच हे भय उदयाला आले आहे. मात्र या भयावर मात करत मानवाने प्रत्येक आव्हान पेलले आहे.प्रत्येक नव्या पिढीला असे वाटते की त्यांच्यासमोर आलेले कोणतेही नवे तंत्रज्ञान त्यांचे मेंदू बिघडवण्यासाठीच आले आहे. गेली दोन हजार चारशे वर्षे हेच चालले आहे. तत्वचिंतक सॉक्रेटिस म्हणाले होते की, लिहून ठेवल्याने आपला मेंदू सडणार आहे. त्यांच्या मते आपण सगळे काही विसरणार आहोत आणि केवळ शहाणपणा शिल्लक राहील. पण प्लेटो हुशार निघाला. त्याने हे सगळे लिहून ठेवले आणि आज २४०० वर्षांच्या नंतर आपल्याला अनेक गोष्टी लिखित स्वरूपात दिसत आहेत.इसवीसन १८८० च्या सुमाराला टेलिग्राफ नावाचे यंत्र अवतरले आणि ठिपके आणि रेषा यांचा काळ सुरु झाला. आता वाक्ये छोटी झाली. समीक्षकांना वाटले की आता कवितेचा अंत होणार आणि आपण सर्व आता तोतरे बोलू लागणार. असे काही झाले नाही. टेलिग्राफ यंत्रणेत प्रत्येक वाक्यानंतर स्टॉप हा शब्द येत असे.




**अलिकडेच** लेखक आणि पत्रकार असलेल्या निकोलस कार यांच्या एका मासिकातील लेखाने खळबळ उडवून दिली. गूगल आपल्या सर्वांना मूर्ख बनवणार आहे आणि इंटरनेट देखील माणसाची एकाग्रता आणि चिंतन करण्याची क्षमता घालवणार आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी जमाई कास्कियो यांनी त्याचा कडाडून विरोध केला. ते म्हणाले की, मानवी आकलन शक्ती आजवर समोर उभ्या ठाकलेल्या सगळ्या आव्हानांना सामोरी गेली आहे. इतकेच नव्हे, तर सुयोग्य विचारांच्या मार्गाने त्यातून उत्क्रांतीचा मार्गही मानवाने शोधला आहे.
आज आपल्या जीवनात आणखी एक लक्षणीय वळण दाखल झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अथवा एआय या नावाने ते ओळखले जाते. मूळ स्वरूपात एआय हा एक विस्तृत भाषा प्रारूपांचा संग्रह आहे. या तंत्रज्ञानाच्या बाबतीत अजूनही काही ठामपणे सांगता येत नसले तरीही आणि ते साधारण बुद्धिमत्तेच्या मार्गाने चालले आहे का? हे सांगण्याची अद्याप वेळ आलेली नसल्यामुळे असे म्हणता येईल की, हे प्रारूप आपल्या संस्कृतीला मान्य झाले की त्याचे विविध उपयोग कळतील आणि मानवाला ते उपयोगीही पडू शकेल. माणसाने तंत्रज्ञानाच्या बाबतीत आजवर अनेकदा हे करून दाखवलेले असल्याने तो पुन्हा एकदा हे नवे तंत्रज्ञानही पूर्णपणे आत्मसात करील, यात शंका नाही.
मानवाचे सर्वात पहिले आकलन असलेले तंत्रज्ञान म्हणजे भाषा हे होते. या भाषेमधूनच आपण जिथे आहोत तिथपर्यंत पोहोचलो आहोत. जगाच्या विविध संस्कृती आणि विविध भाषांशी संवाद सुरु झाल्यानंतर दोन्ही भाषांमधील काही शब्द दोन्ही भाषांमध्ये सामान्य झाले. आधी भाषा आणि नंतर लेखन यांच्यामधून आपल्या मेंदूमधील विचार कागदावर मांडता आले आणि आपण ते वाचूही शकलो. हे वितरण केले गेलेले आकलन होते, ज्ञान होते, हे लक्षात घ्या. इथपर्यंत आल्यानंतर संस्कृतीनेच या साधनांचा उपयोग आपल्याला जगण्यासाठी फायदेशीर ठरेल, अशी खात्री दिली. तरीही आपली नव्या आकलन तंत्रज्ञानाची भीती मात्र कमी झालेली नाही.
सुप्रसिद्ध माध्यम तत्वचिंतक मार्शल मॅक-लुहान यांनी असे मांडले की, माध्यमे म्हणजे माणसाचा विस्तार असतात; मात्र हा विस्तार करताना पूर्वीच्या काही कामांना कात्री लावावी लागते. माणूस लिहिता झाल्यामुळे त्याची स्मरणशक्ती काहिशी कमी झाली असली तरी त्यामुळेच माणूस विज्ञान, इतिहास आणि साहित्य यात सक्षम होऊ शकला. माणूस लिहिता झाल्यामुळे त्याची सांस्कृतिक ओळख काहीशी धूसर होत गेली आणि छपाईच्या तंत्रज्ञानाने तर अनेकांच्या सत्यवचनी अधिकारशाहीला वचक बसवला. आता कृत्रिम बुद्धिमत्तेने आणलेल्या विस्तृत भाषा प्रारूपांमुळे तर्कशुद्धता, निर्मितीक्षमता आणि गंभीर विचार या माणसाच्या निसर्गदत्त प्रतिष्ठा-त्रयीवर आघात होण्याची भीती घोंघावते आहे.
विस्तृत भाषा प्रारूपे ही आजवरच्या कोणत्याही आकलन साधनापेक्षा अधिक घातक आहेत. त्यामुळे ही आजचीच भीती आहे असे नाही, तर त्यांनी येण्याची जी वेळ साधली आहे ती भीती वाढवणारी का आहे, त्यामागची कारणेही समजून घेतली पाहिजेत.
पहिला मुद्दा म्हणजे आपण माणूस आणि तंत्रज्ञान यांच्यात फरक दाखवू शकत नाही. दुसरे असे की, हे तंत्रज्ञान माणसाला बदलण्याची भाषा करीत आहे, त्याची क्षमता वाढवण्याची नाही. तिसरे कारण म्हणजे हे प्रारूप कोणत्याही संस्कृतीपेक्षा अधिक वेगाने वाढते आहे. चौथे कारण असे की, माणूस आतापर्यंत या तंत्रज्ञानाला पूर्णपणे समजून घेऊ शकलेला दिसत नाही. पाचवे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे हे तंत्रज्ञान सरळ सरळ माणसाच्या नैसर्गिक श्रद्धांवर आणि त्याच्या विशिष्ट असण्यावर आघात करीत आहे.
एआयच्या संदर्भातील सुरुवातीच्या काही अभ्यासांमध्ये असे दिसले अथवा दाखवले गेले आहे की, या तंत्रज्ञानामुळे मानवी मेंदू सडण्याचे प्रकार होत असून माणूस या तंत्रज्ञानाचा केवळ उपभोग घेणारा मूर्ख ठरणार आहे. एका अमेरिकन विद्यापीठाच्या अभ्यासात एआय माणसाला मूर्ख बनवते आहे, असे म्हटले असले तरी तेथील अभ्यासाची व्याप्ती केवळ मोजक्या माणसांची होती. दुसऱ्या एका विद्यापीठाच्या अभ्यासात असे दिसले की चॅट जीपीटीचा उपयोग करणाऱ्यांचे ज्ञान उथळ असते. याचा अर्थ सुरुवातीची संशोधने फारशी ग्राह्य ठरवता येणार नाहीत. कोणत्याही नव्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात हे सामान्यपणे होतच असते आणि चॅट जीपीटीची तर जगभरातील संस्कृतीशी ओळख होऊन केवळ काही वर्षेच झाली आहेत. नेमका अंदाज येण्यासाठी किमान दहा वर्षे तरी लागतील.

---

# ज्ञानेश्वरी ग्रंथ हा मानवी जीवन मंदिरातील नंदादीप आहे –ह.भ.प.माधव महाराज डाके

## कार्तिकी एकादशी आणि ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त घरपोच ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेहभेट उपक्रम

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- येथील अंबिका चौक, पांगरी रोड, आदर्श नगर येथे शरद डहाळे यांच्या निवासस्थानी कार्तिकी वद्य एकादशी आणि माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त घरोघरी ज्ञानेश्वरी स्नेहभेट या विशेष उपक्रमांतर्गत काल कार्तिक एकादशी निमित्त मोठ्या श्रद्धा व भवभक्तिने सदरील कार्यक्रम पार पडला.
कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक उत्सवाची शोभा वाढवली.

**सुंदर सजावटीत पार पडलेल्या ज्ञानेश्वरी स्वागत सोहळ्याने भाविक मंत्रमुग्ध**

या उपक्रमासाठी घरासमोर खास शुभ्र रांगोळी, आकर्षक फुलांची उभारणी आणि दिव्यांची लखलखती आरास करण्यात आली होती. ज्ञानदेव तुकाराम गजरात माऊली ज्ञानोबारायांच्या प्रतिमेचे आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे दिमाखदार स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सौ. राखीताई शरद डहाळे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या औक्षणाने झाली. गंध, अक्षता व फुले अर्पण करून ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली.
ज्ञानेश्वरीतील सर्व अध्यायांचे सार अगदी सोप्या भाषेत रसपूर्ण विवेचन करून ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत मांडले.
महाराज म्हणाले, ज्ञानेश्वरी हा आपल्या जीवन मंदिरातला नंदादीप आहे. तो दिवा मनातला अंधार दूर करून आपले जीवन उजळवतो. ज्ञानेश्वरीच्या सतत वाचनाने मनातील अहंकार नाहीसा होऊन मन प्रसन्न राहते. आणि जीवनात आनंदाच्या लहरी निर्माण होतात.



प्रवचना दरम्यान महाराजांनी ज्ञानेश्वरीतील अनेक अध्यायांतील सैद्धांतिक व दृष्टांताच्या ओव्या, संदर्भ, आणि तत्त्वज्ञान श्रोत्यांसमोर मांडले. जीवनातील व्यवहार, मनाची शुद्धी, भक्तीमार्गाचे रहस्य, आणि अहंकाराची धोकादायक बाजू यावर सुंदर भाष्य केले. याबरोबरच ज्ञानोबारायांच्या संत साहित्यातील अमृतानुभव,चांगदेव पासष्टी, हरिपाठ यांचा विस्तृत आढावा घेतला.
महाराजांनी माऊलींच्या संत साहित्याबद्दल बोलताना चांगदेव पासष्टी या प्रसंगावर विशेष प्रकाश टाकला.
चांगदेवाचा गर्वहरण करण्यासाठी ज्ञानदेवांनी निवृत्ती, सोपान आणि मुक्ताबाई यांच्यासह जड भिंत चालवली, तसेच चांगदेव वाघावर स्वार होऊन आल्यावर,त्यांच्या अहंकाराला माऊलींच्या अध्यात्म शक्तीने आळंदीतील जडभिंत चालवून नमवलेयाचे जिवंत चित्रण त्यांनी सादर केले. भाविक या अनुभवाने मंत्रमुग्ध झाले.

**माऊलींच्या ओव्या आणि नित्यपाठाचा आध्यात्मिक महापूर**

आपल्या प्रवचनात पुढे माधव महाराज यांनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या, नित्यपाठ, तसेच भक्तीचा गाभा यावर मनमोहक विवेचन केले. संतसाहित्याचे मोल, माऊलींचे जीवनकार्य आणि आध्यात्मिक साधनेचा प्रभाव यामुळे डहाळे परिवार व उपस्थित श्रोते भारावून गेले होते.

**ऊत्साहाने सहभागी झालेला डहाळे परिवार**

या संपूर्ण उपक्रमात परिवाराने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे राखीताई शरद डहाळे, सौ. उषा भिवराज डहाळे, मंगेश डहाळे, सुरेश डहाळे, अथर्व डहाळे यांनी उत्तम नियोजन केले होते.
या ग्रंथ भेट कार्यक्रमास ह.भ.प. मुकुंद भुतपल्ले (माजी शाखाधिकारी, कॅनरा बँक), योगगुरु ह.भ.प. उबाळे, डॉक्टर विक्रम सिंह कपूर, बाबा पंडित, अनिता पंडित,वृंदावनी साळुंके, यांच्यासह आदर्श नगर परिसरातील असंख्य श्रद्धावान भक्त उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजनात ह.भ.प. महादेव नाना साळुंके यांनी मोलाचे परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट कार्यक्रमाने आमच्या परिवारात आनंदाचा महापुर ओसंडून वाहिला.संपूर्ण परिवार आनंदी झाला. ज्ञानेश्वरी ग्रंथ हा आमच्यासाठी सदैव प्रेरणा देत राहील अशी भावना डहाळे परिवाराचे सदस्य शरद डहाळे यांनी व्यक्त केली.

---

# राष्ट्रवादीची मा.आ.आजबे काका व मा.आ.धोंडेंच्या उपस्थितीत मंगळवारी चुंबळी येथे बैठकीचे आयोजन

## बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -अरुण येवले

डोंगरकिन्ही दि.१६ (प्रतिनिधी):- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) पाटोदा तालुक्याची जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वाची बैठक चुंबळी येथे नागेश्वर महादेव मंदिर येथे मंगळवार दिनांक १८ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केले आहे. या बैठकीसाठी माजी आमदार भीमरावजी धोंडे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक संपन्न होणार असल्याने या बैठकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पाटोदा तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक चुंबळी येथे मंगळवार दिनांक १८ रोजी नागेश्वर महादेव मंदिर येथे आयोजित करण्यात आली आहे. बैठकीसाठी पाटोदा तालुक्यातील सर्वप्रमुख कार्यकर्ते व सर्व सेलचे पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान डोंगरकिन्ही येथील युवा नेते अरुण येवले यांनी केले आहे.





---

# नीट विरोधी विधेयकाला स्थगिती ; सुप्रीम कोर्टात दावा

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसेवा):- वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत तामिळनाडू सरकारने आता सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यापूर्वी, तामिळनाडू सरकारने एक विधेयक मांडले होते ज्यामुळे पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नीटची आवश्यकता रद्द झाली असती. तथापि, राष्ट्रपतींनी या विधेयकाला स्थगिती दिली.
तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे, आणि हा निर्णय कायदेशीरदृष्ट्या आस्थर आणि घटनात्मकदृष्ट्या अन्याय्य असल्याचे म्हटले आहे. तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयास या विधेयकाला स्थगिती देण्याचा निर्णय असंवैधानिक घोषित करण्याची आणि त्याच्या उपयुक्ततेच्या आधारावर विधेयकाची तपासणी करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.
तामिळनाडू सरकारने तामिळनाडू ॲडमिशन टू अंडरग्रेजुएट मेडिकल डिग्री कोर्सेस बिल, २०२१ सादर केल्यानंतर वाद निर्माण झाला. या विधेयकात नीट ऐवजी १२ वीच्या गुणांवर आधारित पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशाची तरतूद असेल. ग्रामीण किंवा सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी नीट हा एक गैरसोयीचा पर्याय आहे असा युक्तिवाद तामिळनाडू सरकारने केला. यानंतर, राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ही याचिका ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड मीशा रस्तोगी मोहता यांनी दाखल केली होती.

---

## पान १ वरुन

### डॉ.योगेशभैय्या सर्व जागा कमळावर लढणार

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली व भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी डॉ.सारिका क्षीरसागर, माजी नगर सेवक शुभम धुत, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर बोलतांना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, आगामी काळात बीड तालुक्यात भारतीय जनता पक्षाची विचारधारा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, पक्षाचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी आणि नागरिकांच्या विकासासाठी पूर्ण प्रामाणिकपणे कार्यरत राहू. बीड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाचा झेंडा अधिक उंच फडकविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

### ना.अजितदादांच्या नावाखाली अधिकाऱ्यांची मनमानी

अशी तरतूद करण्यात आलेली आहे. परिणामी काही ठराविक एजन्सी वगळता इतर कोणालाही यामध्ये भाग घेता येणार नाही अशा प्रकारची हातच्यालाखी या निविदित करण्यात आलेली आहे. त्यामुळे खुल्या निवेदच्या नावाखाली केवळ देखावा करण्याचा प्रयत्न होत आहे इतर कोणत्याही कँपनीला किंवा एजन्सीला ही निविदा भरता येत नाही निविदा भरण्याचा हक्कच नाकारण्यात आले आहे. त्यामुळे या निविदेत केवळ ठरलेले चार ते पाचच लोक येऊ शकतात अशी परिस्थिती आहे. याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाला ऑनलाईन तक्रारी आल्यानंतरही त्याची कोणतीही दखल घेतली गेली नाही त्यामुळे इच्छुक उमेदवार धारकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सदरील निविदा प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी केली आहे. तर काही महिन्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयानेही अशाच पद्धतीने ई-निविदा प्रवास प्रसिद्ध करून केवळ ठराविक ११ एजन्सी नांच निविदा भरता येईल अशी अजब अट टाकुन मनमानी कारभार केला याबाबत ही इच्छुक निवेदधारकांनी तक्रारी केल्यानंतरही काहीही फरक पडला नाही. तर पालकमंत्री अजित पवार यांची भीती दाखवून अधिकाऱ्यांनी आपली उखळ पांढरे करून घेण्याचा प्रयत्न चालवला आहे. पारदर्शक कारभाराचा आणि कोणतेही टेंडर मॅनेज होऊ देणार नाही अशा प्रकारचे जाहीरपणे ढोल वडवणारे पालकमंत्री जिल्हा परिषद प्रशासनांनी केलेली हातच्यालाखी बाबत काय निर्णय घेतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शेअर मार्केटबद्दल तज्ञांचा गंभीर इशारा

वॉल स्ट्रीटचे एक मोठे व्हॅल्युएशन तज्ञ अश्वत दामोदरन यांनी अशीच एक गंभीर इशारा दिला आहे.
दोन पर्याय : एका पॉडकास्टमध्ये बोलताना दामोदरन म्हणाले की, काहीतरी वाईट घडणार आहे. त्यांचा रोख एआय बबल आणि शेअर बाजारावर होता. त्यांनी सांगितले की गुंतवणूकदारांना सोने आणि रोख रक्कम यांसारख्या गोष्टी नुकसानीपासून वाचवू शकतात. ते म्हणाले की, त्यांच्या गुंतवणूक आयुष्यात पहिल्यांदाच ते अशा परिस्थितीची तयारी करत आहेत, ज्याला ते संभाव्य विनाशकारी बाजार म्हणतात.

### आ.सुरेश धस यांच्या हस्ते रस्ते विकास कामांचा आज शुभारंभ

सातत्याने पाठपुरावा करून तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा निधी मंजूर करून घेतला आहे.
ग्रामीण भागातील संपर्क वाढवणाऱ्या या रस्त्यामुळे शालेय विद्यार्थी, शेतकरी, तसेच दैनंदिन कामकाज करणाऱ्या नागरिकांना मोठी सोय असल्याने समाधान व्यक्त केले असून या शुभारंभ कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### रेशन धान्य अवैध विक्री करणाऱ्यांवर जिल्हाधिकाऱ्यांची धाड

हे काढण्यात आलेले पाच किलो धान्य पुरवठा विभागाचे अधिकारी , कर्मचारी व रेशन दुकानदार हे संगणमत करून माजलगाव शहरातील बायपासवर हे सर्व धान्य साठवून ठेवत ते रात्री वेगवेगळ्या वाहनांमध्ये भरून वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्याची व्यवस्था केली जाते.
याबाबतची माहिती बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना मिळाल्यानंतर त्यांनी शनिवारी माजलगाव शहरात येत सदरील साठवून ठेवलेल्या गोडाऊन वर जात धाड टाकली असता या ठिकाणी त्यांना गहू व तांदळाचा मोठ्या प्रमाणात साठा आढळून आला. यानंतर जिल्हाधिकारी यांनी हे गोडाऊन सील करत सदरील व्यक्ती विरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले होते. यामुळे माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे. ही धाड टाकली त्यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ उपस्थित होते.
जिल्हाधिकारी साहेबांनी सदरील गोडाऊन वर धाड टाकली होती या ठिकाणी रेशनचे धान्य आढळून आल्याने साहेबांच्या आदेशावरून सदरील गोडाऊन सील करण्यात आले आहे. सदरील गोडाऊनचे मालक हे शेख अमजद शेख इब्राहिम यांच्या मालकीचे होते. सदरील गोडाऊनमध्ये धान्य किती आहे याची माहिती गोडाऊन सील केल्यामुळे कळू शकली नाही.
-प्राची ठाकूर , नायब तहसीलदार , पुरवठा विभाग माजलगाव.

### १ कोटी महिलांना लाडकी बहीण योजनेतू वगळणार ?

फक्त १ कोटी ३० लाख महिलांनी त्यांचे ई-केवायसी पूर्ण केले आहे. याचा अर्थ असा की १ कोटींहून अधिक लाभार्थी अजूनही ई-केवायसी प्रलंबित आहेत. ई-केवायसी पूर्ण करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे.
ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली कारण मोठ्या संख्येने महिलांवर पूर्वी नोंदणीकृत सुमारे २.५ कोटी लाभार्थ्यांकडून लाभांचा गैरवापर केल्याचा आरोप होता, ज्यामुळे अनेक नावे काढून टाकण्यात आली. तथापि, ई-केवायसी काही मिनिटांत ऑनलाईन पूर्ण करता येते आणि काही सुरुवातीच्या अडचणींनंतर, प्रणाली सुव्यवस्थित करण्यात आली.

**विधवा आणि अनाथ महिलांना अडचणी येतात**

जरी अंतिम मुदत जवळ आली असली तरी, लाखो महिलांनी त्यांचे तपशील अपडेट केलेले नाहीत. त्यांना असे करण्यात अडचणी येत असल्याचे वृत्त आहे. ज्या महिलांचे पती किंवा वडील निधन पावले आहेत त्यांना सर्वांत जास्त अडचणी येत आहेत. वरिष्ठ अधिका-यांनी सूचित केले आहे की आवश्यक असल्यास ई-केवायसीची अंतिम मुदत वाढवली जाईल.

**निवडणुकीच्या वातावरणात सरकारचा मवाळ पवित्रा**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सध्या सुरू आहेत, येत्या काही दिवसांत २६ महानगरपालिकांमध्येही निवडणुका होणार आहेत. निवडणुकीच्या वातावरणामुळे, एका वरिष्ठ नेत्याने सांगितले आहे की, सरकार यावेळी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांबाबत कठोर भूमिका घेणार नाही. काही महायुती नेते ई-केवायसीसाठी नोंदणी काउंटर देखील सुरू करत आहेत आणि लाभार्थ्यांना मदत करत आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की महायुतीने त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात महिलांना देण्यात येणारी रक्कम २१०० पर्यंत वाढवण्याचे आश्वासन दिले होते, परंतु हे आश्वासन अद्याप अपूर्ण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांना किती निधी दिला जातो यावर या योजनांचे भवितव्य अवलंबून असेल.

---

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांचा असमतोलपणा निर्माण झाला आहे. त्यामुळे वाहन चालवितांना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे.

---

## पान ६ वरुन

### तांदळा येथील १५० शेतकऱ्यांना तब्बल दहा वर्षानंतर

साईसागर ॲड.अंबिलवादे,उच्च न्यायालय औरंगाबाद यांचा शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान आमच्या जमिनीवर अतिक्रमण करून रस्ता केला. यात पुन्हा रुंदीकरण करून राष्ट्रीय महामार्ग करत पुन्हा अन्याय केला.शासनाला वेळोवेळी निवेदन देवुन आंदोलन करत ही बाब निदर्शनास आणून दिली. या बाबत केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना मावेजा द्या असे सांगितले आसतांनाही, निगरगट्ट अधिकारी दुर्लक्षित ठेवले. शेवटी न्यायालयाने आम्हाला न्याय हक्क मिळवून दिला आहे असे शिर्डी येथिल साईबाबा मंदिराचे मुख्य पुजारी दिलीप शास्त्री सुलाखे यांनी बोलताना सांगितले.

### तारामती गोरखनाथ काळे यांचे निधन

करण्यात आला. त्यांच्या पश्चात दोन मुले व मुली असा परिवार आहे. काळे कुटूंबियांवर कोसळलेल्या दु:खात दै.पार्श्वभूमी परीवार सहभागी आहे.

### निवडणुकीसाठी धनगर समाजाने सज्ज व्हावे

पंचायत समिती गण अश्या विविध ठिकाणी आपल्या धनगर समाजाची ताकत आहे आपल्याला योग्य पद्धतीने नियोजन करायचे आहे लवकरच या संदर्भात समाजाच्या बैठकीची आयोजन करण्यात येईल अशी माहिती यशवंत सेना धनगर समाज नेते भारत सोन्नर यांनी या अभियान बैठकीदरम्यान दिली या बैठकीस मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक

कारवाई केली आहे.बीड शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की,कोणाकडेही अवैध शस्त्र, तलवार, दारुगोळा किंवा गावठी पिस्तूल असल्याची माहिती असल्यास मो. ७५८८०७७७४ किंवा पीएसआय महेश जाधव ९०२१२१६२५६ यांना कळवावे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे पोलिसांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. सदर कारवाई वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली एपीआय खेडकर, पीएसआय महेश जाधव, गणेश कुमावत तसेच पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशेन उगले, इलियास शेख यांनी केली आहे.

### चिंचोली माळी येथील विद्युत डीपीचा प्रश्न मार्गी

जळालेला डीपी बदलून नवीन डीपी बसविण्याची मागणी या भागातील नागरिकांनी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडे केली. त्यानंतर खा. सोनवणे यांनी विद्युत महावितरण अधिकाऱ्यांना तात्काळ नवीन विद्युत डीपी बसविण्याच्या सूचना दिल्या.

### कालिकादेवी महाविद्यालयात

सहभागी होता येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना मासिक २५,००० पर्यंत वेतन मिळणार असून अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.सर्व उमेदवारांनी आधार कार्ड, बायोडेटा, पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावेत.माहितीसाठी प्रा. डॉ. गणेश आडगावकर (मो.९८५०२०७४७०), प्रा. डॉ. ज्ञानेश्वर येवले (मो. ९८२३७०४०११) आणि प्रा. डॉ. धम्मपाल घुंबरे (मो. ९६१५०००३५८ ) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास कंधारे यांनी केले आहे.

### अंबाजोगाईतील नवतरूणाईचा कल

तसेच राजकिशोर मोदी यांच्याकडे वळल्या जात आहे. राजकिशोर मोदी यांनी मागील तीस पस्तीस वर्षांपासून शहरात विविध शैक्षणिक संस्थाच्या माध्यमातून अंबाजोगाई शहर व परिसरातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षित केले आहेत. त्याचबरोबर बँक , पतसंस्था, मल्टिस्टेट यांच्या माध्यमातून देखील शेकडो तरुण बेरोजगारांना आर्थिक साहाय्य करून त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना उभा केले आहे. बाल- झुंबडच्या माध्यमातून शहर व परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना एक हक्काचे सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळेच राजकिशोर मोदी हे नाव अंबाजोगाई शहरातील लहानापासून ते वयोवृद्ध नागरिकांच्या मना मनामध्ये घर करून आहे. याचा थेट फायदा हा संकेत मोदी व राजकिशोर मोदी यांना व त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांना या नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत हमखास पणे होईल अशी खात्री मोदी परिवारास वाटू लागली आहे.

### गेवराईकरांशी पवार घराण्याचे तीन पिढ्यांपासून ऋणानुबंध आहेत–आ.धस

शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, ॲड.भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे, अरूण मस्के, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, भरत गायकवाड, शिनू भाऊ बेदरे, लक्ष्मण राऊत, जगन पवार, लक्ष्मण चव्हाण, संजय इंगळे, शेख राजू ,शेख रईस,राजू पठाण, वाजेद चौधरी, बाळासाहेब गायकवाड, भैय्या कांबळे, रंजीत खाजेकर, मुन्ना शेठ, विठ्ठल मोटे, सय्यद एजाज, यांच्यासह शेकाडो कार्यकर्ते उपस्थित होते.आ.धस म्हणाले की, गेवराई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या बाजुने जनतेमधून चांगला कौल आहे. महाराष्ट्रात सत्ता आहे. केन्द्र सरकार ही आपले आहे. तुम्ही नगर परिषद आमच्या ताब्यात द्या, गिताभाभींना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या. विकासाच्या दृष्टिकोनातून सर्वाधिक निधी देऊ, असे आवाहन ही आ.सुरेश धस यांनी केले आहे.

### प्रा.अशोक घोडके सत्कारीत

लुंगारे,प्राध्यापक वृंद, शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे.त्यांनी डॉ.दया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान एक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

चित्रकला, गोष्टी सांगणे, वक्तृत्व, नृत्य-गायन अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.मुलांनी या उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.यावेळी शिक्षकांनी पंडित नेहरू यांच्या जीवनातील प्रसंग सांगत बालदिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमाला शिक्षकवर्ग व विद्यार्थी संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ पान -३


### स्वानंद वाचनालय बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

केज दि १६ (प्रतिनिधी)-तालुक्यातील नांदगाव येथील स्वानंद सार्वजनिक वाचनालय येथे दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रा डॉ वासुदेव बप्पा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली थोर क्रांतिकारक बिरसा मुंडा यांची जयंती तसेच दिनांक १४ नोव्हेंबर रोजी क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रथम लहुजी साळवे यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले दरम्यान दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी संत नामदेव महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संत नामदेव महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले. आभार ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी मानले.

## आरशान पठाणचे शतक

### बीडचा ईस्ट झोनवर डावाने व २७० धावांनी विजय



बीड दि १६ ( प्रतिनिधी)-बीडच्या संघाने पुणे येथील सी.पी. ग्राउंडवर झालेल्या एमसीए यू-१४ मेन्स इन्व्हिटेशन टूर्नमेंट २०२५-२६ च्या सामन्यात ईस्ट झोनचा डावाने व तब्बल २७० धावांनी दणदणीत पराभव करत शानदार विजय मिळवला. या विजयात बीडचा आक्रमक फलंदाज आरशान पठाण याने १२६ चेंडूत १७ चौकारांसह खेचून काढलेल्या १०५ धावांच्या शतकी खेळीने महत्त्वाची भूमिका निभावली.

टॉस जिंकत बीडने गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि तो सुरुवातीलाच अचूक ठरला. ईस्ट झोनचा पहिला डाव अवघ्या ७५ धावांत (३४.५ षटक) गडगडला. त्यानंतर बीडने उत्तम फलंदाजी करत ४१० धावांची (६३.२ षटक) भक्कम धावसंख्या उभारली. मल्हार खरवडकर (६८), कुणाल वाघ (६३), कृष्णा गायकवाड (५४) आणि रोहित लोणके (५२) यांनीही महत्त्वपूर्ण खेळी करत संघाला मजबूत बढ़त मिळवून दिली. फॉलोऑन मिळालेल्या ईस्ट झोनचा दुसरा डावही केवळ ६५ धावांत (२३ षटक) संपुष्टात आला.बीडच्या गोलंदाजांनी दोन्ही डावात ईस्ट झोनला पूर्णपणे नामोहरम केले. कृष्णा सचिन गायकवाडने पहिल्या डावात ६ षटकांत ३ मेडनसह ११ धावांत ४ विकेट घेतल्या, तर दुसऱ्या डावात १०.५ षटकांत ६ मेडनसह २२ धावांत पुन्हा ४ विकेट घेतल्या. कुणाल वाघने दोन्ही डावात मिळून ७ विकेट घेतल्या, तर रोहित लोणकेने ५ बळी घेत उत्कृष्ट गोलंदाजी केली. ईस्ट झोनकडून मल्हारने एकहाती लढत देत ५ विकेट घेतल्या. या प्रभावी प्रदर्शनाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी संघातील सर्व खेळाडूंना अभिनंदन व शुभेच्छा दिल्या आहेत.

## बीड नगरपालिकेत उमेदवारी भरण्यासाठी प्रचंड गर्दी

## आज विविध पक्षाकडून अधिकृत उमेदवार जाहीर

बीड दि १६ (प्रतिनिधी) -स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यात असे राजकारणात खलबते सुरू झाली. असे असताना बीड नगरपालिकेसाठी मात्र गेली दोन-तीन दिवसापर्यंत कोणत्या पक्षाच्या उमेदवारामध्ये उमेदवारी संदर्भात स्पर्धा असलेली दिसून येत नव्हती असे असतानाच दोन दिवसात सर्व चित्र बदललं आणि राजकीय हालचालींना वेग आला आहे. नगरसेवक आणि नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दि. १७ नोव्हेंबर हा शेवटचा दिवस असल्याने आजपासूनच नगरपालिका कार्यालयात इच्छुकांची मोठी गर्दी दिसून आली विशेष म्हणजे उमेदवारी दाखल करताना आता खऱ्या निवडणुका लागल्या असे चित्र स्पष्ट दिसून येऊ लागले

माहिती अशी की बीड नगरपालिकेमध्ये नगर अध्यक्ष पदापासून नगरसेवक पदापर्यंत गेली तीन-चार दिवसांनी वातावरण थंड होते. जी काही स्पर्धा दिसून येत होती ती स्थानिक नेत्यांमध्ये परंतु या स्पर्धेमधून जो राजकीय बदल होऊ लागला तसे चित्र बदलू लागले १७ नोव्हेंबर हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने व रविवारची सुट्टी असतानाही, निवडणूक आयोगाने ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही माध्यमांतून अर्ज दाखल करण्यास परवानगी दिली होती. त्यामुळे सकाळपासूनच बहुतांश टेबलांवर उमेदवारांची रांग लागली. अनेकांनी तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आजच अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. उमेदवार कागदपत्राची झुळझुळ करण्यासाठी धावपळ करताना दिसून येत होते.दरम्यान, उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून शेवटच्या दिवशी प्रचंड गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.नवीन राजकीय समीकरणे तयार होण्याची चिन्हे दिसत असून अनेक इच्छुक





''वेट अँड वॉच''च्या भूमिकेत आहेत. कारण सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांची घोषणा अद्याप केलेली नाही. त्यामुळे उद्याच मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची शक्यता असून नगराध्यक्ष आणि नगरसेवक या दोन्ही पदांसाठी इच्छुकांची एकच धावपळ सुरू होणार आहे. शेवटच्या क्षणापर्यंत कोणता पक्ष कोणत्या उमेदवारावर विश्वास ठेवणार ? कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राजकीय वातावरण मात्र दिवसेंदिवस तापत असून आगामी नगरपरिषद निवडणूक त्रिशंकू व अधिक रंगतदार होण्याचे संकेत मिळत आहेत.''

## धनंजय कुलकर्णी व चंद्रकांत पाटील यांची निवड

केज दि १६ (प्रतिनिधी)--भारतीय जनता मजूर संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष शांताप्रकाश जाटव भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रभारी अनुसूचित जाती व जन जाती प्रमुख यांच्या आदेशानुसार भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी यांची तर मराठवाडा विभागीय सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती केली.औदयोगिक विभाग,सामाजिक विभाग,पत्रकारिता, सिनेमा, हॉटेल,जिंनीग कामगार,ऑईल मिल कामगार,साखर कारखाना कामगार, स्कुल कामगार,तसेच असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगार अशा सर्व विभागातील कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी तसेच बांधकाम मजुरांना ज्या सुविधा सध्या मिळत आहेत त्या सर्व सुविधा इतर कामगारांना पण मिळायला हव्यात यासाठी काम करायचे आहे.यासाठी गाव पातळी पासून ते देश पातळीपर्यंत सांघिक बांधणी करत सामाजिक विकास साध्य करायचा आहे व भारताचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या संकल्पनेला सार्थ ठरवण्यासाठी काम करायचे असल्याचे राष्ट्रीय चिटणीस भाऊसाहेब घोडके यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे, संदीप भूतडा हे यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी धनंजय कुलकर्णी व चंद्रकांत पाटील यांना निवडीचे पत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## बीड जिल्ह्यात तब्बल २ लाख १३ हजार शेतकरी फार्मर आयडी पासून वंचित

**माहीती अधिकारातून माहीती उघड**

बीड दि १६ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात एकूण ७ लाख ३७ हजार ,६१० शेतकऱ्यांपैकी तब्बल २लाख ,१३ हजार ०५२ शेतकरी फार्मर आयडी नोंदणीपासून वंचित असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. ही माहिती माहिती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांनी दाखल केलेल्या ठ्ठख अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी कि माहीती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांच्या माहीती अधिकार अर्जाला उत्तर देताना बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार,फार्मर आयडी साठी एकूण नोंदणी व्हायच्या शेतकऱ्यांची संख्या : ७लाख ३७हजार ६१०,तर नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची संख्या : ५ लाख २४ हजार ५५८ इतकी आहे.यावरून फार्मर आयडी पासून वंचित शेतकरी २ लाख १३ हजार ५२ असल्याचे स्पष्ट होते.फार्मर आयडीसाठी नोंदणी करावयाच्या शेतकर्यांची तालूकानिहाय संख्या अंबाजोगाई ५८८२१,आष्टी ८९८३६,बीड १०१०३० धारूर ३५९६५,गेवराई ११६९३९,केज ८६७१० माजलगाव ६२४४३,परळी ५६७२७,पाटोदा ५२२२४ शिरूर ४९५००,वडवणी २७४१५ एकूण -;७३७६१० एवढी आहे तर फार्मर आयडीसाठी नोंदणी केलेल्या शेतकर्यांची तालूकानिहाय संख्या-;अंबाजोगाई ४२३०२,आष्टी ६६१३८,बीड ७३४८७,धारूर २६७९४ गेवराई ७७०४१,केज ६५०२१,माजलगाव ४७२१२ परळी ३९९३८,पाटोदा ३३८७७,शिरूर ३३०९३ वडवणी १९५९५,एकूण -५२४५५८ ऐवढी आहे. खातेदाराच्या संख्येनुसार झालेल्या कामाची टक्केवारी अंबाजोगाई ७१.९२,आष्टी ७३.६२,बीड ७२.७४ धारूर ७४.५०,गेवराई ६५.८८,केज ७४.९९, माजलगाव ७५.६१,परळी ७०.५१,पाटोदा ६४.८७ शिरूर ६६.८५,वडवणी ७१.४८ ऐवढी असून बीड जिल्ह्यात ७१.१८ % टक्के शेतकर्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे प्रशासनाने तातडीने गावपातळीवर मोहीम राबवावी, जनजागृती करावी आणि वंचित शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करावी, '' अशी मागणी माहीती अधिकार कार्यकर्ते निलेश चाळक यांनी केली.

### ग्लोबल प्री प्राइमरी आणि शांती निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन साजरा

बीड दि १६ (प्रतिनिधी)- स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू य यांना लहान मुलांबद्दल विशेष प्रेम आणि जिव्हाळा होता. यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर जन्मदिवस हा बाल दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो.त्यानूसार ग्लोबल प्री प्रायमरी आणि शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, पांगरी रोड,बीड या इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये या दिवशी विविध प्रकारच्या सांस्कृतिक आणि क्रीडा विषय कार्यक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

याप्रसंगी बीड शहरातील बालरोग तज्ञ डॉ.संजय जानवळे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे संचालक बी.बी. जाधव सर ( सनदी लेखापाल ) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सांस्कृतिक नृत्य,शिक्षिका द्वारे मोबाईलच्या दुष्परिणामांवर आधारित कथानकावरील सादर केलेली नाटिका या कार्यक्रमाच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. विद्यार्थ्यांसाठी क्रीडाविषयक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांद्वारे आपले मनोगत व्यक्त करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय समारोप डॉ. संजय जानवळे यानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक सचिन अग्रवाल यांनी, सूत्रसंचालन शिक्षिका सौ.मेघा जोशी मॅडम आणि सौ.स्नेहा नाईक मॅडम यांनी केले. तर आभार सौ.छाया चव्हाण मॅडम यांनी मानलै.

## भाजपा नेते नवनाथअण्णा शिराळे पाटील यांचा वाढदिवस भावीक भक्तांच्या उपस्थितीत साजरा

बीड दि १६ (प्रतिनिधी )-भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राज्याचे उपाध्यक्ष नवनाथअण्णा शिराळे पाटील यांचा वाढदिवस तालुक्यातील पेडगाव येथील हनूमान मंदिरात हजारो भाविक भक्तांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शनिवारी मोठ्या आनंदाच्या वातावरणामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांनी वाढदिवसा निमित्त महाप्रसादाचा लाभ घेतला.वाढदिवसानिमित्त सुरुवातीस नवनाथअण्णा शिरोळे



पाटील यांच्या हस्ते श्री भगवान महारुद्राचे महापूजा व श्री रुद्राभिषेक श्री ब्रह्मवृंदांच्या पवित्र श्री वेद मंत्राच्या जयघोषात संपन्न झाला. यावेळी सुरळे यांच्यावतीने आयोजित केलेल्या महाप्रसादाचे येथे उपस्थित असलेल्या हजारो भाविक भक्तांनी सेवन केले. या वेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ तसेच मराठवाड्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्व भाविक भक्तासह जिल्ह्यातील व बीड शहरातील सर्वच राजकीय क्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील तसेच वकील डॉक्टर इंजिनियर्स पत्रकार सर्व मान्यवर मंडळी उपस्थित होते भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष शंकर देशमुख तसेच भारतीय जनता पार्टीमध्ये नुकतेच प्रवेश केलेले गेवराई चे माजी आमदार तथा माजी मंत्री बदामराव आबा पंडित व सर्जेराव तात्या तांदळे प्रशांत डोरले अशोक लोढा सलीम जहागीर आधी पदाधिकारी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व.डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबास संजय आंधळे मित्र मंडळाची आर्थिक मदत

वडवणी दि १६ (प्रतिनिधी)-वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे वास्तव्यास असलेले शेतकरी श्रीकृष्ण मुंडे यांची मुलगी स्व. डॉक्टर संपदा मुंडे यांनी फलटणमध्ये आत्महत्या केली का त्यांचा खून केला या प्रकरणामुळे महाराष्ट्रात व संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि वडवणी तालुक्यामध्ये एक प्रकारची शोककळा पसरली होती, त्यामुळे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बीड जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी आपला वाढदिवस साजरा न करता स्व. डॉक्टर संपदा मुंडे यांच्या कुटुंबास संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ वडवणी तालुका व भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स वडवणी यांच्या वतीने घेण्यात आला कवडगाव येथे जाऊन ४१ हजार रुपयांची मदत केली.याप्रसंगी वडवणी नगरपंचायत उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे,कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी उपसभापती अनिलदादा चोले, भाजपा जिल्हा सरचिटणीस मच्छिंद्र बप्पा झाटे,रूईचे आदर्श सरपंच ॲड.मयूर भैय्या आंधळे, भाग्यलक्ष्मी डेव्हलपर्सचे मालक तथा वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत धस,साळींबा गावचे युवा सरपंच दिनेश नाईकवांडे,भाजपा युवा मोर्चाचे युवा नेते धनराज मुंडे, लक्ष्मण बापू मुंडे संरपच चिंचाळा,चिंचवण चे युवा नेते देवानंदजी तांबडे,शिक्षक बंडू नागरगोजे,निवृत्ती अण्णा आंधळे,विष्णू आंधळे सर,धाईतिडक सर,विठ्ठल मुंडे सर, आबासाहेब आंधळे सर, पत्रकार जानकीराम उजगरे, शरीफ भाई इत्यादी उपस्थित होते.

## पाटोदा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची उद्या आढावा बैठक

पाटोदा दि १६ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पाटोदा तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक चुबळी येथे नागेश्वर मंदिर महादेव मंदिर येथे दि १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११-४५ वाजता आयोजित केली असून माजी आमदार भीमरावजी धोंडे ,माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते बूथ प्रमुख, विविध सेल चे अध्यक्ष, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे तालुका अध्यक्ष दिपक घुमरे युवक अध्यक्ष युवराज झूनगुरे पाटील यांनी केले आहे..

### विशाल जाजू यांच्या निवडीचे स्वागत

अंबाजोगाई दि १६ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेसच्या बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांनी राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीनुसार विशाल जाजू यांची नियुक्ती केल्याचे नियुक्तीपत्र राजकीशोर मोदी यांच्या हस्ते नुकतेच देण्यात आले. विशाल जाजू हे माजी नगराध्यक्ष स्व विजयकुमार जाजू यांचे सुपुत्र असून त्याचा शहरातील सामाजिक , सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या हिरीरीने सहभाग दिसून येतो. अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेस व राजकिशोर मोदी यांना मानणारा मोठा वर्ग आहे. विशाल जाजू यांची बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. विशाल जाजू यांना जिल्हा उपाध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देताना राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रा महेंद्र आचार्य , सुभाष पाणकोळी, अनुप जाजू, अक्षय जाजू , बारगजे, बाबजे व विशाल जाजू , सुरेश साळवे यांचा मोठा मित्र परिवार उपस्थित होता.

## नवगण राजुरी सर्कल मधून अरविंदाताई गवते इच्छुक

नवगण राजुरी दि. १६( प्रतिनिधी) - जि.प,पं.स निवडणुकीसाठी नवगण



राजुरी सर्कल मधून माजी जि.प. सदस्य अरविंदाताई भगवानराव गवते या निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे समजते.नवगण राजुरी जि.प. गट हा सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असून कामखेडा पं.स.गण हा पण सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असल्याने दोन्ही ठिकाणी महिला उमेदवार रिंगणात उतरणार असल्याचे चित्र आहे. नवगण राजुरी जि. प. गटाच्या माजी सदस्य अरविंदाताई भगवानराव गवते या नवगण राजुरी जि.प. गट किंवा कामखेडा पं.स.गणात निवडणूक लढविण्यास इच्छुक असून त्या निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. भगवानराव गवते हे बेलुरा येथील रहिवाशी असून त्यांचा ग्रामीण भागात चांगला संपर्क असल्याने ते सर्वपरिचित आहेत त्यांचा मनमिळावू, शांत, संयमी स्वभावामुळे त्यांना वाढता पाठिंबा मिळण्याची शक्यता असल्याने ते नवगण राजुरी सर्कलमध्ये प्रभावी उमेदवार ठरू शकतात. या आठवड्यात जि.प, पं.स. निवडणुकीचा कार्यक्रम कधीही जाहीर होऊ शकतो. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच आपला संपर्क वाढून गाठीभेटीवर भर देत आहेत.

## बिहार विधानसभेत माळी समाजाचे २७ उमेदवार विजयी ; बीड मधून अनेकाकडून शुभेच्छाचा वर्षाव

बीड दि १६ (प्रतिनिधी)-नुकत्याच झालेल्या बिहार विधानसभेच्या निवडणुकीत माळी समाजाचे २७ उमेदवार विजयी झालेले वृत समजताच शहरात व जिल्ह्यात अनेकांनी आनंद व्यक्त करत विजयी उमेदवारांचे मोबाईल क्रमांक मिळवून शूभेच्छा दिल्या. बिहार राज्यातील निवडणुकीकडे देशभरातील जनतेचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे या निवडणुकीत माळी समाजाचेही उमेदवार होते. यात माळी समाजाचे २७ उमेदवार विजयी होऊन आमदार झाल्याचे समजताच बीड शहरासह जिल्ह्यातील कित्येक माळी समाज बांधवांनी फोन क्रमांक मिळवत शूभेच्छा दिल्या.

माळी समाजाचा हा झेंडा उंच ठेवणाऱ्या आमदारांमध्ये १. श्री सम्राट चौधरी - तारापुर२. डॉ. सुनील कुमार - बिहारशरीफ ३. श्री भगवान सिंह कुशवाहा - जगदीशपूर४. श्री रत्नेश कुशवाहा - पटणा साहिब, ५. सौ. निशा सिंह कुशवाहा - प्राणपूर, ६. अजय कुशवाहा - मीनापुर ७. बिनीता मेहता - गोविंदपूर, ८. अमरेंद्र कुशवाहा - गोह ९. आलोक मेहता - उजियारपूर, १०. रामेश्वर महतो - बाजपट्टी,११. स्नेहलता कुशवाहा - सासाराम, १२. उमेश कुशवाहा - महनार, १३. जयंत राज - अमरपुर, १४. अभिषेक आनंद - चेरिया बरियापूर,१५. अश्वमेघ देवी - समस्तीपूर, १६. निरंजन मेहता - बिहारीगंज, १७. पप्पू वर्मा - कुर्था,१८. अजय दांगी - टेकरी, १९. सुरेंद्र कुशवाहा - वाल्मीकिनगर, २०. अजय कुशवाहा - विभूतिपूर, २१. अरुण सिंह - काराकाट, २२. सुधांशु शेखर - हरलखी, २३. रामसेवक सिंह - हथुआ, २४. प्रमोद कुमार सिन्हा - रक्सौल ,२५. उपेंद्र प्रसाद - गुरुआ, २६. भीष्म सिंह कुशवाहा - जीरादेई (सिवान), व २७. रामनारायण मंडल - बांका यांचा समावेश आहे त्याचे विजयाचे स्वागत करण्यात आले.

## संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

बीड दि १६(प्रतिनिधी)- शहरातील संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक परजणे सर व विभाग प्रमुख कटारिया मॅडम यांनी प्रतिमेस हार घालून पूजन केले.

यावेळी इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांनी शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली भित्तिपत्रक सादर केले. तसेच इयत्ता तिसरी मधील विद्यार्थ्यांनी प्रीती पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शना खाली एक छोटीशी नाटिका सादर केली. काही मुलांनी गायन केले. बाल दिनानिमित्त पहिली ते चौथी मधील विद्यार्थ्यांचे विविध खेळ घेण्यात आले. आठवी ते दहावी मधील



मुलांना बाल दिनानिमित्त चित्रपट दाखवण्यात आला. गव्हाणे मॅडम यांनी मुलांसाठी गाणे सादर केले. अशाप्रकारे संपूर्ण कार्यक्रम प्रीती पाटील यांनी परजणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षक व शिक्षकेतर यांच्या साथीने यशस्वी केला. कार्यक्रमाची सांगता मुलांना खाऊ वाटून करण्यात आली. असे पत्रकात म्हटले आहे.

# सफदर अली देशमुख राष्ट्रीय विद्यालय पेंडगाव येथे बाल दिन उत्साहात साजरा



बीड दि.१६ (प्रतिनिधी):- स.अ.दे. राष्ट्रीय विद्यालय पेंडगाव शाळेत भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचा १४ नोव्हेंबर हा जन्म दिवस बाल दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती येवले ए.बी व प्रमुख पाहुणे पुराणिक के.डी हे होते. सर्वप्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी प्रतिमेचे पूजन केले. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थांनी भाषणे केली. त्यानंतर अध्यक्षीय भाषणांमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती येवले ए.बी यांनी विद्यार्थ्यांना बालदिना विषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे शिक्षक कोकाटे सर, चादर सर, गाडे सर, जवळेकर मामा व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठीच्या निवेदनाची तुकाराम मुंडे यांच्याकडून गंभीर दखल

बीड दि.१६(प्रतिनिधी):- समान संधी संपूर्ण सहभाग हक्कांचे संरक्षण दिव्यांग व्यक्ती हक्क अधिकार अधिनियम २०१६ या अधिनियमाची अंमलबजावणी २७ डिसेंबर २०१६ पासून सर्वत्र धीम्या गतीने होत आहे. हीच बाब विचारात घेऊन दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंढे यांच्यासह गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक परिमंडळ, उपपोलीस अधिक्षक, सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी तत्परतेने निवेदन सादर केले होते. त्याची दुखल प्रधान सचिव श्री तुकाराम मुंढ यांनी घेतली .सदर तक्रार निवेदनात नमूद केल्याप्रमाणे दिव्यांग व्यक्ती / दिव्यांग कर्मचाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींचे हक्क इतर व्यक्तींप्रमाणेच संरक्षित असतील याची खात्री करावी , तसेच दिव्यांग व्यक्तींचे घर, शासकीय संस्था, सर्व कामाची ठिकाणे, शासकीय व खाजगी निवासस्थान इत्यादी सर्व ठिकाणी शोषण, अपमानजनक वागणुक, गैरवर्तन, शारिरीक, मानसिक, लैंगिक व भावनात्मक तसेच हिंसात्मक अशा सर्व बाबींपासून दिव्यांग व्यक्तींना संरक्षण व पोलीस तक्रार नोंदविण्याचा अग्रक्रम देणे या बाबींचा अंतर्भाव तक्रार निवेदनात केला होता.

म्हणून आठवले यांच्या निवेदनाच्या आधारे दि.१३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव श्रीयुत तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग व्यक्तींना संरक्षण देणारे शासकीय निर्देश जारी करून जिल्हा दंडाधिकारी व न्याय दंडाधिकारी यांना दिव्यांग व्यक्तींविरोधात होणाऱ्या सर्व प्रकारच्या अत्याचारास तात्काळ प्रतिबंधीत करण्याचे आदेश दिले. या आदेशाचे अनुपालन झाले नाही तर जिल्हा कार्यकारी दंडाधिकारी व न्याय दंडाधिकारी यांच्यासह शासकीय प्राधिकरणाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वय अनुच्छेद १८८ व २२३ अन्वय कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात नमूद केले आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिलेल्या शासकीय निर्देशाचे सर्व शासकीय प्राधिकाऱ्यांनी अनुपालन करावे या स्वरूपाची माहिती दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांच्यासह जिल्हा अध्यक्ष अजिनाथ हाडुळे, सचिव दिनेश गाडे, गोविंद वायकर,कु.सुरेखा खेडेकर.इ संघटना पदाधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्तींच्या हितार्थ प्रसिद्धीपत्रकान्वये दिली आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

# शेतकऱ्यांना सोलार पंपची सक्ती का?

## राष्ट्रीय किसान मोर्चाने केला सवाल

पुणे दि. १६(वृत्तसेवा):- शेतात नवीन बोअर घेतले आहे. त्यासाठी वीज कनेक्शन पाहिजे. परंतु महावितरणचे इंजिनिअर, कर्मचारी सरळ सांगत आहेत. शासनानेच नवीन वीज कनेक्शन देण्याचे धोरणच बंद केले आहे. कोणत्याही शेतकऱ्यांस कृषी पंपासाठी महावितरणकडून वीज कनेक्शन/जोडणी भेटणार नाही. तर मग शेतकऱ्यांनी सोलार पंप साठी अर्ज करावा. मागेल त्याला आम्ही सोलार पंप देवू पण वीज कनेक्शन देणार नाही. काही काही अधिकाऱ्यांनी तर लिहून दिल आहे की वीज कनेक्शन देणे बंद केले आहे सोलार पंप साठी अर्ज करावा. महावितरण आणि शासन हे शेतकऱ्यांना सक्ती करत आहे सोलार पंप घेण्यासाठी. सोलार पंप घेण्यास शेतकऱ्यांना काही अडचण नाही बरेच शेतकरी सोलर बसवूनही घेत आहेत. पण ही शक्ती कशासाठी असा सवाल राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दीपक इंगळे यांनी केला. यासंदर्भात प्रसिद्ध दिलेल्या पत्रकार त्यांनी नमूद केले की सोलार पंप च्या काही मर्यादा देखील आहेत .१) जसे की, ज्या शेतकऱ्यांचे बोअरवेल हे ५००,६००,७०० फूट आहेत त्या शेतकऱ्यांनी कस करायचं ? तिथे सोलार सिस्टम काम करत नाही.२) तसेच ज्या शेतकऱ्यांनी ५०० ते २००० फुटापासून तसेच त्यापेक्षा लांब अंतराहून शेतात पाइपलाइन आणली आहे. त्यांना सोलर पंप कसा चालणार ? ३) तसेच सोलार पंप इंस्टॉल केल्यापासून ५ वर्ष मेंटेन्स हे कंपनी करणार आहे . त्यानंतरचा मेंटन्स हा शेतकऱ्यांनी करायचा. महावितरण किंवा कंपनी कोणीही जबाबदार असणार नाही.४) तसेच बऱ्याच भागात वन्य प्राणी हे सोलार पॅनेलचे नुकसान करण्याची शक्यता असते.५) असे बरेच शेतकरी आहेत ज्यांनी शेतात बोअर घेतला आहे. त्याला चांगले पाणी लागल्याने त्यामध्ये मोटार टाकली. साधारण लाख- दीड लाख खर्च केला. आता त्या शेतकऱ्यांस महावितरण कडून वीज कनेक्शनची गरज असते. तो शेतकरी महावितरणकडे जातो आणि वीज जोडणीची मागणी करतो तेंव्हा महावितरणचे इंजिनिअर त्यांना सांगतात की वीज कनेक्शन देणे आम्ही बंद केले आहे. तुम्ही सोलार घ्या. सोलर ची प्रोसेस करून देखील वर्ष वर्ष दोन दोन वर्ष सोलार दिले जात नाही. मग ज्या शेतकऱ्यांने लाख दीड लाख खर्च केलेला असतो. तो शेतकरी हतबल होतो.



६) ज्या शेतकऱ्यांनी तीन चार वर्षापूर्वी वीज जोडणी साठी महावितरणला पैसे भरले आहेत. त्यांना अद्याप वीज जोडणी दिली नाही. चार वर्षांनंतर त्या शेतकऱ्यांना महावितरण कडून फोन येतो आणि पैसे परत घेवून जा आम्ही तुम्हाला वीज कनेक्शन देणार नाही असे सांगितले जात आहे. अशा शेतकऱ्यांनी काय करायचे ? असे नमूद करून राष्ट्रीय किसान मोर्चाने असाही सवाल ? केला आहे की

१) शेतकऱ्यांना सोलार पंप ची सक्ती केली जावू नये. ज्या शेतकऱ्यांना सोलार पाहिजे ते सोलर घेतील. ज्या शेतकऱ्यांना वीज जोडणी पाहिजे ते वीज जोडणी घेतील. शासनाने/ महावितरणने दोन्ही ऑप्शन सुरू ठेवले पाहिजेत.

२) सोलार सक्ती फक्त शेतकऱ्यांनाच का ?

महावितरण कंपनी आणि शासनाने सोलार ची सक्ती ही फक्त शेतकऱ्यांनाच केली आहे. असे का ?

शेतकरी सोडून समजा एखादा उद्योजक/ व्यापारी/ व्यावसायिक/ इतर कोणताही उपभोक्ता जेंव्हा वीज जोडणी मागण्यासाठी महावितरण कडे जाते तेंव्हा त्या कोणाला तरी म्हणते का, की तुमचा कारखाना/ तुमचा उद्योग/ तुमचा प्लांट/ तुमचा व्यवसाय हा सोलर वर चालवा आम्ही वीज जोडणी देणार नाही म्हणून.मग ही सक्ती फक्त शेतकऱ्यांनाच का ? असा सवाल राष्ट्रीय किसान मोर्चा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दीपक इंगळे यांनी सोशल मीडियावर टाकलेल्या व्रतातून केला आहे.

# अज्ञात व्यक्तीने ग्रामपंचायतचे रेकॉर्ड जाळले

बीड दि १६(प्रतिनिधी)-अज्ञात व्यक्तीने दारूच्या नशेत शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश करत महत्त्वाचे दस्तऐवज पेटून दिल्याची घटना आष्टी तालुक्यातील घटना सुलेमान देवळा येथे उघडकीस आली असल्याचे वृत्त सोशल मीडियावर आल्याने खळबळ उडाली आहे.

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील एका दारूने झिंगलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्रीच्या दरम्यान हातात कुऱ्हाड घेऊन ग्रामपंचायतीचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून महत्त्वाचे दस्तऐवज अस्ताव्यस्त करत पेटवून दिले. ४० ते ५० रजिस्टर व महत्वाचे दस्तऐवज,फाइल जळून खाक झाले आहेत, अशी माहिती गावकऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी त्र्यंबक मुळीक यांना दिली. दरम्यान, ग्रामविकास अधिकारी मुळीक, सरपंच दादा यदु घोडके, अतुल पोपट घोडके, भिमराव सुखदेव भादवे, सचिन भगवान खोरदे, नवनाथ,एकनाथ भोजे या पंचाच्या उपस्थितीत नुकसानीचा पंचनामा करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे ग्रामविकास अधिकारी मुळीक यांनी सांगितले.

# पदवीधर मतदारांनी नोंदणी करून घ्यावी-डॉ.संजय तांदळे

बीड दि.१६ (प्रतिनिधी ):- पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त अर्जाच्या आधारे प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येणार असल्या तरी निवडणूक आयोगाने दि. १० डिसेंबर २०२५ पर्यंत नव्याने पदवीधरांची नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. दि.१० डिसेंबर २०२५ पर्यंत प्राप्त होणाऱ्या अर्जावर उचित निर्णय घेऊन पात्र मतदारांचा समावेश दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीमध्ये करण्यात येणार आहे. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी दि. ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत प्राप्त अर्जाच्या आधारे प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येणार असल्या तरी निवडणूक आयोगाने दि. १० डिसेंबर २०२५ पर्यंत नव्याने पदवीधरांची नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. दि.१० डिसेंबर २०२५ पर्यंत प्राप्त होणाऱ्या अर्जावर उचित निर्णय घेऊन पात्र मतदारांचा समावेश दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीमध्ये करण्यात येणार आहे. तरी मराठवाडा विभागाचा रहिवासी असलेल्या पदवीधर मतदारांनी औरंगाबादविभाग पदवीधर मतदार संघ, मतदार नाव नोंदणी राहिली असेल अशा मतदारांनी एक जबाबदार नागरिक म्हणून आपली नावे १० डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदवून यादीत समाविष्ट करावी असे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठानचे तथा जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# संपादकीय

## आला थंडीचा महिना

यंदा वातावरणीय बदलामुळे पाऊस बराच लांबला होता. त्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने हिवाळा थोडा उशिरा सुरू झाला. आता मात्र कडाक्याची थंडी पडली आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये लोक गुलाबी थंडीचा अनुभव घेऊ लागले आहेत. राज्यात एकीकडे थंडीचा प्रभाव वाढत असताना प्रदूषणाची पातळीही वाढत आहे. सर्वच प्रमुख शहरांमध्ये ही प्रदूषण पातळी स्थानिक नागरिकांसाठी घातक असून निर्धारित मानकांपेक्षा हे निर्देशांक अधिक असल्याचे दिसून येत आहे. राज्यात गत काही दिवसांपासून थंडीचा कडाका वाढत असून तापमानात सातत्याने घट होत आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. आता अनेक ठिकाणी गारठा वाढला आहे. वातावरणातील बदलामुळे लोकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. ऐन नोव्हेंबरमध्ये काही ठिकाणी कडाक्याची थंडी पडल्याने सकाळी व रात्रीच्या वेळी शेकोट्या पेटत आहेत. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात आधीच कमी तापमान नोंदवले गेले असताना तापमानाचा पारा आणखी खाली जाण्याची शक्यता आहे. वातावरणातील बदलामुळे विविध आजार बळावले असून रुग्णसंख्येत वाढ होत आहे. थंडीमुळे न्युमोनिया, सर्दी, खोकला, कावीळ, दमा, त्वचेवर खाज असे विविध आजार बळावले आहेत. वातावरणातील बदलानंतर थंडीचा प्रभाव सर्वांत आधी होतो तो आपल्या त्वचेवर. त्वचा कोरडी पडणे, ओठ फाटणे, पायांच्या चिरांत वाढ, त्वचा लाल होणे अशा समस्या सुरू होतात. या सर्वांवर वेळीच उपचार न केल्यास त्वचेचे नुकसान होऊ शकते. थंडी वाढल्याने अनेकांचे कपाटात गेलेले स्वेटर, कानटोप्या पुन्हा बाहेर निघू लागल्या आहेत. सध्या राज्यासह देशभरात थंडी वाढल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला असून उत्तरेकडील थंड वारे राज्याच्या दिशेने वाहत असल्याने बहुतांश भागात किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील किमान तापमान ते अंश सेल्सिअसने घसरले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात गुलाबी थंडीची लाट पसरली आहे. हिवाळ्याचा तडाखा वाढल्याने जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. सकाळी दाट धुक्याची चादर पसरत असल्याने दृश्यमानतेतही घट होत आहे. रस्त्यावरील वाहतूकही मंदावत आहे. रस्त्यावर सकाळी आणि रात्री फारच कमी नागरिक दिसत आहेत. शालेय मुलांना थंडीचा सर्वाधिक त्रास होत असल्याने अनेक ठिकाणी शाळा उशिरा सुरू करण्याची मागणी पालक करीत आहेत. मुंबईकरही थंडीची हुडहुडी अनुभवत आहेत. मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर, नवी मुंबई आणि रायगडमध्येही थंडीचा कडाका वाढला आहे. पहाटेच्या वेळी नागरिकांना गुलाबी थंडीचा अनुभव येत आहे. पुणेकरांना देखील थंडी जाणवू लागली आहे. अनेक ठिकाणी पहाटेच्या वेळी शेकोट्या पेटल्याचे दिसून येत आहे.उत्तर भारतातील हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्ये थंडीचा कडाका वाढत असतानाच महाराष्ट्रावरही या शीतलहरींचा परिणाम झाला आहे. विशेषत: उत्तर महाराष्ट्रात तापमानाने निचांकी आकडा गाठला असून विदर्भ आणि कोकणही या थंडीच्या लाटेत सापडला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात थंडीचा कडाका वाढत असून पारा दिवसागणिक घटताना दिसत आहे. मुंबई शहर व उपनगरात पहाटेच्या वेळी तापमानात घट होत असून दुपारच्या वेळी मात्र प्रचंड उष्मा जाणवत आहे. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार पुढील ४८ तासांत दक्षिण भारतात पावसाची हजेरी लागू शकते.

# श्री नारायण मा.व उच्च मा.विद्यालयात बाल दिवस साजरा



बीड दि १६(प्रतिनिधी)- तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पुजन केले . संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर सर्व शिक्षक ,प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी पंडित जवाहर नेहरूंची वेशभूषा करून आले होते. विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे केली .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करपे सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.धर्मराज पौळ सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.मस्के जी.बी यांनी मानले.कार्यक्रमाला प्रा.अशोक घरत सर , इनकर बी .जे,प्रा. मुरमुडे सर, चौधरी पी. बी, रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर, प्रा.सौ. मस्के मॅडम, चव्हाण सर ,पवार पी .एल ,शेख ए.के, रकटे बी. आर उपस्थित होते.

# राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात बाल दिन साजरा

बीड दि १६ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय अभ्यासक्रम विद्यालय बीड व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्या श्रीमती तायडे डी.ओ.ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पाटील ए .आय.व ज्येष्ठ शिक्षक पाटील पी . एन .हे होते .सर्वप्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. बाल दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे केली .यावेळी स्काऊटगाईड पथकामार्फत गणवेश स्पर्धा, उत्साहवर्धक खेळ यात टीम वर्क ला प्रोत्साहन देण्यासाठी आकर्षक खेळाचे आयोजन, रंगवर्धन स्पर्धा यात चेहरा रंगवणे, सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत स्काऊटगाईड यांचे गाणे, नृत्य नाटक सादर केले .सामुदायिक विकास उपक्रमांतर्गत शालेय परिसरात स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन घाटे आय .एस . व श्रीमती वाघमारे ए .के . यांनी केले तर आभार प्रदर्शन जाधव व्ही .पी.यांनी मानले .




# मराठी भाषेच्या समृद्धतेला सुरुवात सावता महाराजांच्या अभंगापासून होते ;प्रा.लक्ष्मण गुंजाळ



बीड दि १६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात मराठी भाषेतून कीर्तनाची आणि अभंग लेखनाची सुरुवात सावता महाराजांनी केली आहे. मराठीतील पहिले संतकवी म्हणून त्यांचे मराठी भाषेला समृद्ध करण्याचे कार्य आतुलनीय आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. बीड येथील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. परमेश्वर बनकर लिखित श्री संत सावता महाराजांचे चरित्र आणि अभंग या पुस्तक प्रकाशन प्रसंगी प्रा.गुंजाळ प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की सावता महाराजांनी वारकरी संप्रदायाला अधिक समृद्ध आणि व्यवहार्य बनविले. कर्मे इशू भजावा या मूलभूत सिद्धांतांचा आग्रह त्यांनी प्रथमत: आपल्या अभंगातून केला. प्रपंच आणि परमार्थ यांचा अजोड मेळ असण्याची शिकवण श्री संत सावता महाराजांच्या चरित्रातून मिळते. नामस्मरण आणि कर्म सिद्धांतावर आधारित त्यांनी अभंग रचना केली. सावता महाराजांच्या विचाराचा प्रभाव श्री नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज तसेच तुकडोजी महाराज यांच्या अभंगावर दिसून येतो असेही प्रा.गुंजाळ म्हणाले. प्रा. बनकर यांनी हे पुस्तक अत्यंत परिश्रमाने आणि अभ्यासपूर्ण रीतीने लिहिले आहे. ह. भ. प. श्रीकृष्ण उबाळे महाराज यांनी सावता महाराजांच्या जीवनातील अतार्किक आणि अवैज्ञानिक कथांचे खंडन केले.प्रा. सुशीलाताई मोराळे म्हणाले की वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ संत म्हणून सावता महाराजांचे श्रेष्ठत्व आहेच आहे. लक्ष्मण ढवळे यांनी श्री संत सावता महाराजांच्या चरित्राची आवश्यकता प्रतिपादन करून ती समाजाची भूक प्राध्यापक बनकर यांनी भागिले असे म्हटले.आजिनाथ गवळी यांनी संत विचार हे समाजात सहिष्णुता बंधुभाव निर्माण करू शकतात म्हणून अन्य संतांची ही पुस्तके समोर आली पाहिजेत असे म्हटले. ज्योतीराम हुरकुडे म्हणाले की पुस्तक लेखन आणि पुस्तक वितरण या दोन्ही बाबतीत आपण कमी पडतो. प्रा.बनकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत हे धाडस केलेले आहे. याप्रसंगी श्रीमती पाटील मॅडम,सरपंच सुपेकर इत्यादींची समायोजित भाषणे झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथ लेखक प्रा. परमेश्वर बनकर यांनी केले. ग्रंथलेखनाची भूमिका त्यांनी विशद केली. ग्रंथ काढण्यामागचा हेतू आर्थिक प्राप्ती हा नाही तर सावता महाराजांचे विचार हे सर्व बहुजन समाजापर्यंत जावेत ही तळमळ मनाशीआहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री शेळके यांनी केले.कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

# भाजपचे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा व प्रेरणेचे केंद्र बनेल-ना.पंकजाताई मुंडे

## छ.संभाजीनगर येथे भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

छ.संभाजीनगर दि.१६(प्रतिनिधी):- भारतीय जनता पक्षाचा पाया हा संघर्षातूनच उभा आहे. अटलजींनी त्या काळामध्ये ना हार मे, ना जीत मे, ना भयभीत किंचित में असे म्हणत ही संघर्षाची बीजं पेरली. त्या संघर्षमय वाटचालीला नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून यश मिळवून देत सुवर्ण सुवर्णकाळ आणला आहे असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी केले.भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. त्यावेळी ना पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या संघर्षातून सुवर्णकाळाकडे झालेल्या वाटचालीची थोडक्यात प्रभावी मांडणी केली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,भारतीय जनता पक्षाने त्या दशकांमध्ये पक्ष वाढीसाठी मोठा संघर्ष केला. मात्र आज तोच पक्ष संपूर्ण भारतात यशस्वी झालेला आहे. त्या दशकातील पक्ष वाढीसाठी खस्ता खाल्लेल्या सर्व नेत्यांचे हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खरे करून दाखवले आहे.



बिहारमध्येही आपल्याला प्रचंड यश मिळाले आहे. आता कोणतेच राज्य असे राहणार नाही जिथे भाजपाची पूर्ण सत्ता नसेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनही भाजपाला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद मिळाले आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचे स्वप्न होते की तिसऱ्यांदा भाजपचा मुख्यमंत्री झाला पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी ते पूर्ण केले आहे. आज प्रत्येक जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यालय उभी राहत आहेत. ही कार्यालय केवळ कार्यालये न राहता ती निश्चितच प्रत्येक कार्यकर्त्याला ऊर्जा देणारी केंद्रे होणार आहेत. मराठवाड्यातील एक कार्यालय भाजप कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा केंद्र होणार असून या ठिकाणाहून प्रत्येकाला निश्चित ऊर्जा मिळेल भाजपा रुजवण्यासाठी वाढवण्यासाठी त्या दशकातील आपल्या प्रमोद महाजन असो किंवा मुंडे साहेब असो यांनी पक्षाच्या बाबतीत पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे याचा प्रचंड आनंद होत आहे. येणाऱ्या काळात नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषदांमध्येही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला भरघोस यश मिळवायचे आहे. त्यासाठी सर्वांनी काम कामाला लागावे असे आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

## अठरा पगड जातीचा देव श्री खंडोबा यात्रोत्सव निमित्त

# मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

माजलगांव (प्रतिनीधी) : शहरातील पुरातन सर्वांचे कुलदैवत व आराध्य दैवत जागृत देवस्थान श्री. खंडोबा मंदीरात चंपाष्टी यात्रोत्सव निम्मित १८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे चे आयोजन केले आहे.तरी सर्वा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा आसे अवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तंजनाने केले आहे.

एके काळी माजलगांव मध्ये आपल्या सर्वांचे कुलदैवत असलेले श्री खंडोबा मंदीर खंडोबा मैदानात. पाय ठेवायला जागा पुरत नव्हती एवढी मोठी खंडोबा यात्रा. भरत होती आता जागेच्या आभावीमुळे थोड्या प्रमाणात खंडोबा यात्रा भरते. पुरातन दगडी चिरेपासुन माजलगांवच्या खंडोबा मंदिर बनवलेले होते. तेच दगडी चिरे आज भी जशा तशे आसुन.मंदीराच्या आत मधील गभारात चिर किवां छिद्र सुध्दा दिसणार नाही आस मजबुत दगडी चिरेच्या बाहेरच्या लगत नवीन बांधकाम केलेले आहे.माजलगांव चे पुरातन खंडोबा मंदीर है ७० वर्षोंच्या पुढचे आहे. खंडोबाच्या समोरचा नंदी सुध्दा पन्नास वर्षाच्या पुढचा आहे. आजुक सुध्दा जसा तसा आहे. या खंडोबाच्या नंदीच वजन जास्त आहे. पाच जनाला सुध्दा उचलत नाही.

श्री खंडोबा देव , म्हालसांदेवी व बानुदेवी या देवाच्यां मुर्ती साक्षात



भूतलावर आवतरल्या सारख्या वाटतात.

१८ नोव्हेबर रोजी मंदीरात घटस्थापना , २५ नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता २१०० दिपोत्सवचा कार्यक्रम , २६ नोव्हेंबर रोजी चंपाष्टी निम्मित ५ वाजता सकाळी देवाचा महाभिषेक ला सुरुवात होईल सकाळी ७ वाजता खंडोबा मल्हासादेवी ,बाणुदेवी यांचा विवाहचा कार्यक्रम ,व महाआरती सकाळी ११ वाजता, रक्तदान शिबिर ,२७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते ५ महाप्रसाद सहीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविक भक्तानी धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन तुम्ही आम्ही सर्व भक्तजनाने केले आहे ..खंडेरायाला रेवड्या व भंडाराची उधलन माजलगांवच्या खंडोबाला चंपाष्टी दिवशी माजलगांवतील आठरा पकड जाती चे भाविक खंडोबा मंदीरात येऊन. सदानंदाचा येळकोट येलकट जय मल्हार चा गजरात रेवड्या भंडाराची उधलन होते. रेवड्या व भंडारा मंदिरावर उधलेला भक्तजन प्रसाद म्हणून घेतात. व आपल्या कपाळावर भंडारा लावतात. घरोघरी तली भंडारा माजलगांव शहरातील भाविक आपल्या घरी चंपाष्टी दिवशी. देवाच्या ताब्यांचे कोंटुबाची पुजा करून. वाग्यांचे भरीत, बाजरीची भाकरी, काद्यांची पात. इत्यादी पदार्थाचा नैवेद्य. ठेवुन पाच वेळा सदानंदाचा येळकोट येलकट जय चा गजर करुन. तली भंडारा कार्यक्रम होतो व वांगी व कांदा खानाची परवानगी मिळते.

## भगवान बिरसा मुंडांचे विचार आजही महत्त्वाचे-सौ.नमिताताई अक्षय मुंडदा



अंबाजोगाई दि १६(प्रतिनिधी)- धैर्य, स्वाभिमान आणि संघर्ष- ही बिरसा मुंडांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, पर्यावरणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी त्यांनी दिलेला लढा आजच्या युवकांना मार्गदर्शक ठरतो. त्यांनी आदिवासी समाजासाठी शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांवर प्रकाश टाकत शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबन या मुद्द्यांची आवश्यकता अधोरेखित केली. बदलत्या काळात युवकांनी पुढाकार घेऊन समाजाच्या उन्नतीसाठी योगदान देण्याचे आवाहन आ. नमितताई मूंदडा यांनी केले

आदिवासी स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक, धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अंबाजोगाई शहरात राजाभाऊ वामनराव ठाकूर यांनी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. हनुमंत साळुंके, सहाय्यक प्राध्यापक, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बिपिन क्षीरसागर, संचालक, दीनदयाल नागरी सहकारी बँक अंबाजोगाई तसेच तानाजी देशमुख, विशाल केंद्रे व इतर समाजातील मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.नमितताई म्हणाल्या,बिरसा मुंडांचे जीवन म्हणजे संघर्षाची शाळा. त्यांनी दाखवलेला मार्ग आजही आदिवासी समाजाच्या विकासाची दिशा ठरवतो. युवकांनी त्यांच्या विचारांचा वारसा आत्मसात करून समाजकार्याच्या क्षेत्रात संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. हनुमंत साळुंके, यांनीही मार्गदर्शन केलेअध्यक्षीय समारोपात राजाभाऊ वामनराव ठाकूर यांनी केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सौ वैशाली विलास ठाकूर यांनी मांडले तर सूत्रसंचालन ज्योती शंकर ठाकूर यांनी केले. सौ सिंधुताई आपेट यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. .

## आज बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे कीर्तन

बीड दि.१६ प्रतिनिधी-श्रीक्षेत्र रामतीर्थ (ता. बीड) येथे प.पू. महायोगी दादा महाराज खडकीकर यांच्या विसाव्या पुण्यतिथीनिमित्त धार्मिक उत्सवाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे श्रद्धा, भक्ती आणि हरीनामाच्या गजरात सुरू होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात यंदा दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी झाली. सप्ताहाचे औचित्य साधत विविध आध्यात्मिक कार्यक्रम, प्रवचने, कीर्तन आणि भजन मंडळांच्या सेवा सुरू असून परिसरात दिंडी, नामा-घोष आणि धार्मिक शिस्तीने वातावरण भारावून गेले आहे.

या आध्यात्मिक सप्ताहातील प्रमुख आकर्षण म्हणून दि. १७नोव्हेंबर, रात्री ९.०० ते ११.०० या वेळेत प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे प्रभावी हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. अल्पवयातही संत परंपरेचा गाढा अभ्यास, ओजस्वी आवाज, समजूतदार विचार आणि मनाला स्पर्श करणारी निरूपणे यामुळे सोहम महाराजांची किर्तनसेवा संपूर्ण जिल्ह्यात लोकप्रिय झाली आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून रामतीर्थ परिसरात भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. पांडुरंगाच्या नामस्मरणात हरएक भक्ताने सहभागी व्हावे, कीर्तनातून अध्यात्मिक ऊर्जा व संस्कारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक विद्यागुरु खडकीकर यांनी केले आहे. सप्ताहादरम्यान रामतीर्थ परिसरात स्वच्छता, पाणी, प्रसाद, बसण्याची व्यवस्था आणि सर्व सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्थानिक सेवेकऱ्यांचा उत्साह व भक्तांच्या सहभागामुळे वर्षानुवर्षे हा कार्यक्रम अधिक भव्यतेने साजरा होत आहे. आजच्या सोहम महाराज सातपुते यांच्या कीर्तनासाठी सर्व भक्तांनी उपस्थित राहून हरीनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने अल्पवयीन पीडितेची केली सुटका



बीड दि.१६ (प्रतिनिधी):अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाच्या पीएसआय पल्लवी जाधव व त्यांच्या पथकाने अल्पवयीन पीडितेची सुटका केली. यातील आरोपीला पोलिसांनी केली आहे.

दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ०२/२०२४ नुसत कलम ३६३, ३७० नुसार, दाखल गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे तपासावर होता. फिर्यादी तसेच आरोपीचे नातेवाईक यांच्या चौकशी दरम्यान त्यांच्याकडून उपयुक्त माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे तांत्रीक पद्धतीने कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी यांचे वास्तव्य सोलापुर जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून दि. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी एएचटीयु चे पथक सोलापूरकडे रवाना झाले. सोलापूर येथे पोहोचल्यावर रात्रीच्या अंधारात पीडित व आरोपीचा शोध घेत होती. पहाटे ३.०० वाजता पीडित मुलगी व आरोपी हे दोघे केडगाव ता. करमाळा जि. सोलापूर येथे मिळून आले. त्यानं ताब्यात घेऊन करमाळा पोलीस ठाण्यात हजर केलेत्यानंतर सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी दिंद्रुड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झङ्ख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

## वस्ताद लहुजी साळवे हे पहिले सशस्त्र क्रांतीचे जनक आहेत-रोहित कसबे

अंबाजोगाई दि १ (प्रतिनिधी)- सशस्त्र क्रांतीचे जनक, क्रांती गुरु, क्रांती पिता, वीर वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीच्या निमित्ताने केज शहरातील विविध भागांमध्ये सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून वस्ताद लहुजी साळवे यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहून क्रांतिकारी लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यासाठी समाज एकवटला होता.यावेळी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून अभिवादन सरकरण्यात आले या कार्यक्रमाला केजच्या नगराध्यक्षा डॉ.सौ. सिताताई बनसोड, शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, नगर पंचायतचे गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार तसेच लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्षा प्रियंकाताई लांडगे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष सौ.

शितलताई लांडगे,आझाद क्रांती सेना तालुकाध्यक्ष शरद भाऊ थोरात आणि इतरही मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीच्या निमित्ताने क्रांतीनगर भागामध्ये शालेय साहित्य वाटप करून लहान विद्यार्थ्यांना खिचडी वाटप करण्यात आली. तसेच त्यांना वस्ताद लहुजी साळवे यांचा इतिहास सांगण्यात आला.आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

## आळंदी येथील कासार धर्मशाळेत ९ हजार वारकऱ्यांना खिचडी वाटप

शिरूर कासार दि १६( प्रतीक भांडेकर)- श्रीक्षेत्र आळंदी येथे विश्वमाऊली संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७२९ वा संजिवन समाधी सोहळा सुरू असुन लाखो भाविक ईंद्रायणी तिरी माऊलीचा गजर करत आहेत ,येणा-या वारक-यांना एक सेवा म्हणून कासार धर्मशाळेच्या वतीने ९००० वारक-यांना एकादशी दिवशी फराळाची खिचडी तर द्वादशी दिवशी रविवारी सकाळपासुनच खमंग खिचडी देऊन सेवा समर्पित केली .माऊली प्रसाद घ्या असा आदरपुर्वक आग्रह केला जात होता .

संजिवन समाधी सोहळ्यासाठी लाखो भाविक आळंदीत आले असुन काहींची हक्काची व्यवस्था ही वेगवेगळ्या मठ धर्मशाळेत होत असते तरिही हजारो वारकरी मोकळ्या जागेवर थांबलेले असतात अशा वारक-यांना देखील अन्नदान देण्यासाठी अनेक संस्था सरसावत असतात, आळंदी कासार धर्मशाळा देखील अनेक वर्षापासुन दोन दिवस प्रसाद वाटप उपक्रम राबवत आहे .

धर्मशाळेचे अध्यक्ष मोहनराव कोळपकर यांचेसह त्यांचे सर्व विश्वस्त सहकारी या उपक्रमाद्वारे वारक-यांची सेवा करत आहेत .

## वैद्यकीय व थकित देयके आवक क्रमांकाच्या ज्येष्ठतेनेच काढावीत-धनंजय कुलकर्णी

बीड दि.१६(प्रतिनिधी) - बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वैद्यकीय परिपुर्ती मंजुरी आदेश व देयके तसेच थकित वेतने,रजा देयके, वरीष्ठ, निवड श्रेणी, पदोन्नती, आदर्श शिक्षक पुरस्कार वेतनवाढ इत्यादीचे एरिएर्स देयके दोन दोन वर्षापासून प्रलंबित आहेत. सदरील देयके अदा करताना पारदर्शकता व नियमितता महत्वाची असल्याने प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे अशी माहिती जिल्हा संपर्क प्रमुख शहादेव मराठे व अण्णासाहेब झांबरे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जिल्हा परिषद बीड मध्ये शिक्षण विभागात वैद्यकीय परिपुर्तीचे मंजुरी आदेशासाठी शेकडो प्रस्ताव प्रलंबित आहेत तर लेखा विभागाकडे थकित वेतन,रजा देयके, वरीष्ठ व निवड श्रेणी एरिएर्स बिले, आदर्श शिक्षक पुरस्कार वेतनवाढ एरिएर्स बिले, पदोन्नती वेतनवाढ बिले, सेवानिवृत्त बांधवांची अंशदान व रजा देयके मोठ्या प्रमाणात दोन तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत,असे जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे, जिल्हा उपाध्यक्षा अर्चना नाथ यांनी स्पष्ट केले आहे. परिणामी सदरील देयके अदा करताना संभाव्य अनियमितता व शोषण होऊ नये यासाठी यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. यासाठी प्रहारने या सर्व प्रलंबित आदेश व देयकांची माहिती मिळावी अशी मागणी मा. शिक्षणाधिकारी साहेब यांच्या कडे केली असून, सदरील सर्व माहिती सोशल मीडिया वर प्रसिद्ध करण्याची मागणी निवेदनातून केली आहे, अशी माहिती जिल्हा उपाध्यक्ष पी.आर.खेडकर, वैशाली आकुसकर यांनी दिली आहे.

## बिरसा मुंडांनी स्वातंत्र्यलढ्याची ज्योत पेटवली-सखाराम वनवे



दिंद्रुड दि.१६ (प्रतिनिधी)- आदिवासी विकास विभाग, प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत छत्रपती संभाजी नगर प्रकल्पाच्या प्रकल्पाधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम व सबंधित अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तर शाळेचे मुख्याध्यापक सखाराम वनवे सर व त्यांचे सहकार्यानि धरती आबा बिरसा मुंडा यांच्या एकशे पन्नासव्या जयंतीनिमित्त ''जनजाती गौरव दिनानिमित्त'' गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,वेशभूषा स्पर्धा,नृत्य स्पर्धा, रांगोळी, नाटक, भाषण अशा विविध स्पर्धेचे आयोजन शाळेमध्ये केले होते. यावेळी बोलताना सखाराम वनवे यांनी बिरसा मुंडांनी स्वातंत्र्यलढ्याची ज्योत पेटवली असल्याचे प्रतिपादन केले.

आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केल्यानंतर धरती आबा बिरसा मुंडा यांनी केलेल्या कार्य याविषयी शाळेतील विद्यार्थी रोहिदास वाकतकर,वेदिका कोकाटे,शिवानी पांढरे,कुश मुकाडे अशा अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.श्यामबाला वाकतकर व रेखा अंभोरे या विद्यार्थिनीनी बिरसा मुंडा यांच्या वरील गीत सादर केले.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी पारंपारिक वेशभूषा करून,आदिवासी नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. त्याच दरम्यान मंचावर अवतरलेले विद्यार्थी रुपी ''बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे''यांची हुबेहूब वेशभूषा साकारलेले विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.तर अंधश्रद्धा यावर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारच नाटक सादर केले.तसेच विविध स्पर्धेतील बक्षिसाचे वितरण मंचावरील मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी शिक्षक गोरक्षनाथ आबुज यांनी मनोगत केले तर अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक सखाराम मोरे यांनी केला.या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील शिक्षक परमेश्वर तावसे,नागनाथ चात्रे, जी.बी आबुज,व्ही व्ही कुलकर्णी,श्रीमती.सारिका डोंगरे, श्रीमती गायकवाड मॅडम श्रीमती. पुनम लांब, मुकाडे मॅडम,बी.व्ही.बडे, हनुमान केंद्रे यांच्यासह शिक्षक इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.बी व्ही बडेसर तर आभार प्रदर्शन श्री संभाजी मुसळे सर यांनी केले.

## आ.विजयसिंह पंडितांनी हक्काचा पिटीआर मिळवून दिल्यामुळे

# संजयनगर भागात राष्ट्रवादीचा बोलबाला

गेवराई दि.१६ (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ.विजयसिंह पंडित यांनी अनेक वर्षांपासून रखडलेला संजयनगर येथील नागरीकांच्या पीटीआरचा प्रश्न कायम निकाली काढला असून या भागातील लोकांना हक्काचा पीटीआर मिळवून दिल्यामुळे संजयनगर भागात न.प.निवडणूक प्रचारात राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा बोलबाला सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहराचा चेहरामोहरा बदलायचा आहे, त्यासाठी विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना नगर परिषदेमध्ये पाठवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांनी केले आहे. गेवराई



शहरातील प्रभाग क्र.१ मध्ये मतदारांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.१ मध्ये राष्ट्रवादीच्या महिला कार्यकर्त्यांनी प्रचार फेरी काढली होती. संजयनगर, शिवाजीनगर या भागातील मतदारांच्या गाठीभेटी घेऊन सौ.शितलताई दाभाडे यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, नगर परिषदेची निवडणूक मतदार बंधू-भगिनींनी आपल्या हाती घेतली आहे. यापुढील काळात गेवराई शहराचा कायापालट करण्यासाठी आमच्या पदरात मतांचे आशिर्वाद द्या असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभाग क्रमांक १ मधील उमेदवार विठ्ठल पवार, भास्कर काकडे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षा मुक्ताताई आर्दड, शहराध्यक्षा पल्लवी गोगुले, उपाध्यक्षा किरण दाभाडे, सिमा हुंडे यांच्यासह समाधान मस्के, रवि पवार, बाबुराव बेदरे, राम बेदरे, शंतनू परदेशी, रवि सुतार, महेश पंडित, संतोष खंडागळे, दादा बेदरे, किशोर खंडागळे, अभिजीत तौर, स्वप्नील वाडकर, आकाश गोरे, जिजा पंडित, अमोल दावडकर, किशोर बेदरे, अजय माने, किरण ढवारे, सखाराम गोरे, नितीन ढवारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाळगी प्रबोधिनीकडून डिसेंबरमध्ये भीम गीत गायन स्पर्धा

बीड दि १६(प्रतिनिधी)- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा संदेश भावी पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी, तसेच सामाजिक जाणीव, लोकशाही मूल्ये आणि बंधुत्वाची भावना दृढ करण्याची प्रेरणा गीत गायनाच्या माध्यमातून मिळावी, या उद्देशाने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने युवकांसाठी लेडी रमाबाई सभागृह सपो महाविद्यालय टिळक रोड पुणे येथे भीम गीत - वैयक्तिक गायन स्पर्धेचे आयोजन, दि. १५-१६ डिसेंबर २०२५ रोजी पुण्यामध्ये केले आहे.

या अनोख्या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील वय वर्षे १८ ते ३५ वयोगटातील तरुण गायकांनी अवश्य सहभागी व्हावे, असे आवाहन प्रबोधिनीच्या वतीने करण्यात आले आहे. ही वैयक्तिक गायनाची स्पर्धा असून, स्पर्धकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर, विचारांवर किंवा त्यांच्या समाजक्रांतीच्या प्रेरणादायी कार्यावर आधारित गीत सादर करणे अपेक्षित आहे. संगीत क्षेत्रातील अनुभवी, मान्यवर कलाकार आणि तज्ज्ञ स्पर्धेत परीक्षण करणार आहेत.

यामध्ये प्रथम क्रमांकाच्या गायकाला रु.५० हजार, द्वितीय क्रमांकासाठी रु.३५ हजार आणि तृतीय क्रमांकासाठी रु.२५ हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर उत्तेजनार्थ म्हणून रु. १५ हजारची ४ बक्षिसेही दिली जातील. प्रत्येक स्पर्धकाला सहभागाचे प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी प्रथम स्वत: गायलेल्या गीताचा व्हिडिओ आयोजकांना पाठवायचा आहे. व्हिडिओद्वारे पाठवलेल्या गीतांचे परीक्षण करून तज्ज्ञ परीक्षक प्रत्यक्ष (अंतिम) स्पर्धेसाठी स्पर्धकांची निवड करतील.

अधिक माहितीसाठी, स्पर्धेचे नियम पाहण्यासाठी आणि व्हिडिओ पाठवण्यासाठी www.rmponweb.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. असे आवाहन विद्याभूषण बेदरकर ९८९०३३२६६६ यांनी केले आहे.


दै.पार्श्वभूमी,बीड Date-17/11/2025

**DECLARATION**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME - ALANE RAVIRAJ BHAGAWANRAO

New Name - ALANE RAVIRAJ BHAGWANRAO

ADDRESS : 62, SHIVAJI NAGAR MAJALGAON, DIST. BEED-431131 M.S.

# पार्श्वभूमी

दि.१७ नोव्हेंबर २०२५ सोमवार



## तारामती गोरखनाथ काळे यांचे निधन



बीड दि.१६(प्रतिनिधी):- बलभीम चौक येथील रहीवाशी असलेले अमोल काळे यांच्या आई श्रीमती तारामती गोरखनाथ काळे यांचे दि.१६ नोव्हेंबर रविवार रोजी पहाटे ५:०० वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्यावर रविवारी दुपारी १:०० वाजता बार्शी नाका जवळील श्री भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील असलेल्या जवळील स्माशानभूमीत अंत्यविधी पान २ वर

## तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये बालदिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी) -: देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी बालदिन तसेच पंडित जवाहरलाल नेहरू जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर प्राचार्या सौ.उमा जगतकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांसाठी पान २ वर

### तांदळा येथील १५० शेतकऱ्यांना तब्बल दहा वर्षानंतर मिळाला न्याय

# राष्ट्रीय महामार्गसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा सहा आठवड्यात मावेजा देण्याचा उच्च न्यायलायाचा आदेश

**कोळगावदि.१६(प्रतिनिधी)–तालुक्यातील तांदळा येथील १५० शेतकऱ्यांच्या जमिनीवर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ साठी १९६३ साली अनाधिकृत अतिक्रमण करत रस्ता केला. हे अतिक्रमण सरकारने केले असल्याचे वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास कागदपत्री दाखवुन देखील या प्रकरणी कारवाई न करता उडावा उडवीचे उत्तर देत शेतकऱ्यांवर सतत अन्याय केला. मात्र उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी अवमान याचिकेवर निकाल देत शासनाने सहा आठवड्यात शेतकऱ्यांना मावेजा द्यावा, असे आदेश दिल्याने संबधित शेतकऱ्यांना अखेर न्याय मिळाला आहे. या याचिकेत शेतकऱ्यांच्या बाजुने ॲड.साईसागर अंबिलवादे उच्च न्यायालय संभाजीनगर यांनी काम पाहिले. निकाल मिळताच तांदळा येथील साईबाबा मंदिरात गावकऱ्यांनी आंनद उत्सव साजरा केला.**

गेवराई तालुक्यातून कल्याण विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. हा महामार्ग होण्याआधी गेवराई तालुक्यातील तांदळा येथील शेतकऱ्यांच्या शेतातून पुर्वसुचना न देता हा रस्ता वहिती शेतातून केला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. ही बात बांधकाम विभाग रस्ते विभाग आणि जिल्हा अधिकारी यांच्या दरबारी या गांवचे भुमिपुत्र शिर्डी येथिल साईबाबा मंदिराचे मुख्य पुजारी दिलीप शास्त्री सुलाखे यांनी लोकशाही मार्गाने वेळोवेळी दिली आहे. पण श्री सुलाखे यांनी न्यायलय व शासनास पाठपुरावा केला. त्यामुळे १५० शेतकऱ्यांना तब्बल ६२ वर्षांनंतर न्याय मिळाला

न्यायालयाने अवमान याचिकेवर निकाल देताना म्हटले आहे की, शेतकरी कसत असलेल्या जमिनी अनाधिकृत नोटिशी देवून वाढीस संपादन करत अन्याय केला. याचा सविस्तर अभ्यास तांदळाचे भुमिपुत्र तथा शिर्डी येथिल साईबाबा मंदिराचे मुख्य पुजारी दिलीप शास्त्री सुलाखे यांनी गावकऱ्यांनी एकत्र करून मागील काही वर्षांपासून लोकशाही मार्गाने आंदोलन केले. शासनाला वेळोवेळी निवेदन देवुन आंदोलन करत ही बाब निदर्शनास आणून दिली. या बाबत केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना मावेजा द्या असे सांगितले आसतांनाही, निगरगट्ट अधिकारी यांनी टोलवाटोलवी करत काहीच कारवाई केली नाही. म्हणून दिलीप शास्त्री सुलाखे व गावातील १५० शेतकऱ्यांनी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद न्यायालयात सन- २०२३ मावेजा मिळावा म्हणून याचिका दाखल केली. त्या याचिकेची निकाल शेतकर्यांच्या बाजुने लागला, तरीही मावेजा न दिल्याने आवमान याचिका क्रं- २७७/२०२४ रिट याचिका क्रमांक- ८०८८/२०१९ मध्ये दिलीप विश्वंभर सुलाखे विरुध्द युनियन ऑफ इंडिया ( भारत संघ) खंडपीठ नितीन बी, सुर्यवंशी आणि वैशाली पाटील -जाधव न्यायमूर्ती यांनी दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी आदेश देत सहा आठवड्यात शेतकऱ्यांना मावेजा द्यावा अशा आदेश केला, यावेळी शेतकऱ्याच्या बाजुनी उच्च न्यायालयात ॲड.साईसागर अंबिलवादे उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी परखड बाजु मांडल्याने शेतकऱ्यांना मावेजा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, या निकाल नंतर साई बाबा मंदिर तांदळा येथे पान २ वर

## तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक





४ तलवारी केल्या जप्त

बीड दि.१६ (प्रतिनिधी) शहरातील अजीजपुरा भागात नूरमजेच्या बाजूला रविवार दि.१६ नोव्हेंबर रोजी दुपारी २.१५ वाजण्याच्या सूमारास तलवार घेऊन फिरत असलेल्या व्यक्तीस बीड शहर पोलिसांनी अटक केली. त्या इसमाकडून चार तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांकडून अवैध शस्त्रधारकांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. सदरील व्यक्ती शेरसिंग हिंदू सिंग टाक, वय अंदाजे ५५ वर्ष, रा. वडवणी, ता.वडवणी जि.बीड असून त्याच्याकडून आणखीही अवैध शस्त्रे मिळण्याची शक्यता आहे.पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व पोलिस ठाणे प्रमुखांना निवडणूक काळात अवैध शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने बीड शहर पोलिसांनी तत्परता दाखवत ही पान २ वर

## चिंचोली माळी येथील विद्युत डीपीचा प्रश्न मार्गी

चिंचोली माळी (प्रतिनिधी) - केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नागबेट भागातील विद्युत डीपी मागील वर्षभरात १४ वेळा जळाल्याने विजेचा प्रश्न गंभीर बनला होता. शेवटी खा.बजरंग सोनवणे यांनी नवीन डीपी उपलब्ध करून देत विजेचा प्रश्न सोडविला आहे. चिंचोलीमाळी येथील नागबेट भागात अनेक कुटुंब वास्तव्यास असून या भागातील विद्युत डीपी वर्षभरापासून सतत १४ वेळा जळाल्याने या भागातील विजेचा प्रश्न गंभीर बनला होता. सतत विद्युत पुरवठा खंडित राहत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या भागात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. मागील काही दिवसांपासून विद्युत पुरवठा नसल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. पान २ वर

## परिवार कलेक्शनचा थाटात शुभारंभ





बीड दि.१६ (प्रतिनिधी):- पेठ बीड भागातील बालाजी मंदिर समोर सुरु झालेल्या परिवार कलेक्शनचा दि.१६ नोव्हेंबर रविवार रोजी थाटात शुभारंभ झाला. शुभारंभ दिनी व शुभारंभा अगोदरच ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

लहान मुले, युवा वर्ग, पुरुष, महिलांचे थंडीपासून बचाव करणारे स्वेटर, मफलर, जॅकेट, शाल आदी कपडे अत्यंत वाजवी दरात मिळत असल्याने ग्राहकांनी पसंती देत प्रचंड प्रतिसाद दिला. तसेच रेडीमेड शर्ट, पॅन्ट, नाईट पॅन्टलाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे. उत्तम दर्जाचे कपडे अत्यंत वाजवी दरात मिळत असल्याने ग्राहक समाधानी झाला आहे. आलेल्या सर्व निमंत्रीत, स्नेही, ग्राहक वर्गाचे संचालक मुरलीधर राऊत, सौरभ राऊत, अथर्व राऊत, नवरंग गणेश मंडळ व राऊत परिवाराने स्वागत केले. यावेळी सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## कालिकादेवी महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन

शिरूर कासार दि.१६(प्रतिनिधी):- आदर्श शिक्षण संस्थेचे कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.) येथे वाणिज्य विभाग, प्लेसमेंट सेल आणि टॅलेंट कॉर्पोरेशन सोल्युशन्स प्रा. लि., पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नोकरी भरती मुलाखत मेळावा दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ वार सोमवार रोजी कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे.या रोजगार मेळाव्यात ६०० हून अधिक पदांसाठी विविध नामांकित कंपन्यांमध्ये भरती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना नामांकित उद्योगसमूह जसे की TATA, Hyundai, LG, Reliance, Havells, Voltas, Mahindra, JSW, Hitachi, D-Mart, Amul, Bajaj Electronics, JCB इत्यादी कंपन्यांमध्ये करिअरची सुवर्णसंधी मिळणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पदवीधर तसेच १०वी, १२वी, आय.टी.आय. व डिप्लोमा धारक उमेदवारांना या मेळाव्यात पान २ वर

## अंबाजोगाईतील नवतरुणाईचा कल राजकिशोर मोदी यांच्याच बाजूने ?

अंबाजोगाई दि.१६(प्रतिनिधी):- अंबाजोगाई नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जसजशी जवळ येऊ लागली आहे तसे शहरातील विविध प्रभागातील अनेक नवतारुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस तथा राजकिशोर मोदी यांच्याकडे जाहीर प्रवेश होऊ लागला आहे. या नवतारुण युवा मतदारांच्या मुळे युवा नेते संकेत मोदी तसेच राजकिशोर मोदी यांचा आत्मविश्वास द्विगुणीत होतांना दिसून येत आहे. सर्व नवतरुणाईने एकवटून अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच त्याच्या सर्व नगरसेवकाना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन सुरू केले आहे. अंबाजोगाई शहरात युवा नेतृत्व संकेत राजकिशोर मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून त्याची साथ देण्यासाठी अंबाजोगाई शहरातील प्रभाग क्रमांक १, प्रभाग क्रम २ , प्रभाग क्रमांक ३ , ४, ९,१०, ११ ,१२, १४,१५ या प्रभागातील पटाईत गल्ली, बागवान गल्ली , झारे गल्ली, चौभारा परिसर, मंगळवार पेठ, बलुत्याचा मळा, गौड गल्ली, धनगर गल्ली, साबून गल्ली, मणियार गल्ली, सदर बाजार, भोई गल्ली, गवळी पुरा, गांधी नगर, बिलाल नगर, क्रांती नगर या व अशा अनेक भागातील असंख्य नवतरुण बिनशर्त संकेत मोदी पान २ वर

## प्रा.अशोक घोडके



अंबाजोगाई दि १६ (प्रतिनिधी) - केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील ग्रंथपाल अशोक माणिकराव घोडकेयांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहिती शास्त्र या विषयात पीएच डी पदवी प्रदान केली.या यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील,खा. रजनीताई पाटील,संस्थेचे सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे,सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.बी.पाटील,डॉ. हनुमंत सौदागर,श्रीकांत पान २ वर

## एमडीसाठी पात्र ठरल्याबद्दल डॉ.निकिता सपाटे सत्कारित



दिंद्रुड दि.१६ (प्रतिनिधी) - माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील डॉ.निकिता संगीता संजय सपाटे एमडी साठी पात्र झाली आहे. त्यामुळे त्यांचे येथील संजीवनी मल्टी स्टेट व विश्वास अर्बन परिवाराच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. दि. २८ एप्रिल रोजी प्रवरा आयुर्वेदिक महाविद्यालय शेवगाव येथे पार पडलेल्या बीएमएस पदवीदान समारंभात मान्यवरांच्या हस्ते डॉ. निकिता संगीता संजय सपाटे यांना पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्य आले होते. डॉ.सपाटे या नुकत्याच एमडी साठी पात्र झाल्या आहेत.डॉक्टर निकिताचे वडील कवी संजय सपाटे हे संजीवनी मल्टीस्टेट व विश्वास अर्बन मध्ये कुशल नियोजक, व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मोठा स्नेही मित्रपरिवार आहे. त्यामुळे त्यांनी डॉ.निकिता संगीता संजय सपाटे यांच्या यशाबद्दल उत्साहपूर्वक सत्कार करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.यावेळी निकिताची आई सौ.संगीता वडील संजय सपाटे सह मल्टीस्टेटचे कर्मचारी व मित्र परिवारांची कौटुंबिक उपस्थिती होती.

## गेवराईकरांशी पवार घराण्याचे तीन पिढ्यापासून ऋणानुबंध आहेत-आ.धस

### नगर परिषदेला पाहिजे तेवढा निधी देऊ-आ.सुरेशअण्णा



गेवराई दि १६ (प्रतिनिधी) :- गेवराई शहरातील नागरिकांचे आणि बाळराजे पवार यांच्या कुटुंबाचे गेल्या तीन पिढ्यांपासून ऋणानुबंध आहेत. त्यामुळे, नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार गिताभाभी पवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, यात शंकाच नाही. मायबाप मतदारांनी छप्पर फाड विजय मिळवून द्यावा. शहराच्या विकासासाठी आमचे सरकार निधी कमी पडू देणार नाही. असे वचन देऊन, गेवराई च्या जनतेने माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली नगर परिषदेची सत्ता द्यावी, असे आवाहन आ.सुरेश धस यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केले आहे.रविवार ता. १६ रोजी सकाळी अकरा वाजता भारतीय जनता पक्षाचे निरीक्षक आ.सुरेश धस यांनी गेवराई शहरात येऊन भारतीय जनता पक्षाच्या निवडणुकीचा आढावा घेतला. माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांच्या निवासस्थानी आ. धस यांनी भेट देऊन नगर परिषदेचे उमेदवार, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी माजी आ.ॲड.लक्ष्मणराव पवार, युवा नेते बाळराजे पवार, पान २ वर

## निवडणुकीसाठी धनगर समाजाने सज्ज व्हावे–



बीड(प्रतिनिधी): यशवंत सेना धनगर समाजाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त गाव वाड्या वस्त्यावरील अहिल्यांच्या इतिहासाची जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे या अभियानाच्या माध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांचा महान इतिहास प्रत्येक लोकापर्यंत पोहचवला गेला पाहिजे याच उद्देशाने गाव वाड्या वस्त्यावरील यशवंत सेना धनगर समाज नेते भारत सोन्नर यांचा दौरा चालू आहे आता स्थानिक स्वराज्य निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे या निवडणुकीत आपल्याला ताकतीनिशी लढवायची आहे यासाठी सज्ज राहा बीड जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद सर्कल पान २ वर

## भाजपामधून निष्ठावंत कार्यकर्ते रामलिंग मुंडे यांना धुनकवड गणातून संधी मिळणार ?

बीड दि.१६(प्रतिनिधी):- स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांचे वारे सध्या जोरात आहे त्यामुळे इच्छुक सुद्धा जास्त प्रमाणात आहेत पण धुनकवड पंचायत समिती गणातून उच्चशिक्षित व कर्तव्यदक्ष तरुण उमेदवार रामलिंग मुंडे यांच्या नावाचीच सर्वत्र सर्वसामान्य नागरिकांत चर्चा चालू आहे त्यांनी आतापर्यंत सर्वसामान्य जनतेसाठी खूप मोलाचे कार्य केले आहे लोकांच्या सुख दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देण्याचे तसेच शासकीय कार्यालयातील लोकांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचे कार्य केले आहे तसेच त्यांनी आतापर्यंत भाजपचे आणि नामदार पंकजा ताई मुंडे यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणूनच काम केले आहे धुनकवड पंचायत समिती गणात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे त्यामुळे भाजपने रामलिंग मुंडे यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष उच्चशिक्षित सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या प्रामाणिक कार्य करणाऱ्या युवकास संधी द्यावी अशी मागणी धुनकवड पंचायत समिती गणातील सर्वसामान्य जनतेची आहे


## पाहिजेत

पेपर वाटण्यासाठी मुले पाहीजेत.
योग्य पगार दिला जाईल.
- संपर्क-
लक्ष्मी न्युज पेपर एजन्सी,बीड.
मोबा.८२०८३४३५६३
१६१८३

## पाहिजेत

श्री महालक्ष्मी ॲटो एजन्सी करिता

1) कॉम्प्युटर ऑपरेटर - 1
अनुभव असणाऱ्यास प्राधान्य
2) सेल्समन/मार्केटींग - 1
3) एजन्सीवर कामा करिता - 2

:: संपर्क ::
हॉटेल शांताईच्या पाठिमागे, शाहुनगर, बीड.
Mob.9421350354
PP